


फेब्रुवारी १९७३

वर्गणीदारांना महत्त्वाची सूचना!

दर खेपेस पुढील महिन्याचा 'चांदोबा' चालूं महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत ग्राहकांच्या पत्त्यावर पोष्टानें पाठविण्यांत येतो. ग्राहकांस आमची अशी विनंती आहे कीं, ठराविक तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास पोष्ट ऑफिसला लिहून कळवावें व तसें केल्याचें आम्हालाहि कळवावें.

डाल्टन एजंसीज

'चंदामामा बिल्डिंगज्' :: मद्रास - २६



चांदोबा

संस्थापक : नागिरेड्डी
संचालक : 'चक्रपाणी'

या अंकातील 'वेताळ कथा' तिच्या नावाप्रमाणे अगदीच 'राक्षस विवाह' नाही. युक्ती व धाडस यांचे उदाहरण स्वरूप अशी एक सुंदर गोष्ट आहे.

या अंकाबरोबर 'एका दिवसाचा सुलतान' ही दीर्घकथा संपत आहे. पुढील अंकापासून अरबस्तानाच्या लोक कथांपैकी एक नवीन दीर्घकथा सुरू करण्यात येईल.

विद्वान माणसाला देखील व्यवहार कौशल्य असावे लागते हे 'व्यवहार कौशल्य' गोष्टीत वाचावे.

वर्ष : २२ फेब्रुवारी १९७३ अंक : ८



हरवलेली अंगठी

एका शबर राजाच्या पदरी इल्लू आणि मल्लू नावाचे दोन नोकर होते. दोघे विश्वासपात्र नोकर होते. परंतु राजाची मर्जी कां कोणास ठाऊक, इल्लूवर जास्त होती.

एकदा राजाने दोघांना बोलाविले व म्हणाला–"जा, तुम्ही आपापल्या घरी जाऊन चार दिवस बायकापोरांबरोबर राहून या. चार दिवसांनी एक मेळावा आहे, तेव्हां या." असे सांगून राजाने दोघांना इनाम म्हणून एकेक वस्तु दिली. इल्लूला एक दगड मिळाला आणि मल्लूला सुरणाचा कांदा मिळाला. दोघे आश्चर्य करीत राजाचा निरोप घेऊन आपापल्या गावी निघाले.

इल्लूला राजाने इनाम म्हणून एक दगड कां दिला हे कळले नाही. त्याला त्याबद्दल राग आला. त्याचे ओझे उचलून नेण्यापेक्षां तो कोठेतरी ठेवून देण्याचे ठरवून त्याने एका झुडपात तो ठेवून दिला.


ते पाहून मल्लू म्हणाला–"अरे, हा सुरणाचा कांदा तरी कमी वचनाचा आहे का? पण त्याची भाजी करून तरी खाता येईल. म्हणून तू पाहिजे तर हा घे. मी राजाने दिलेला दगड ठेवून घेतो."

इल्लू त्या गोष्टीस कबूल झाला आणि दोघांनी परस्परांच्या बक्षिसाची अदलाबदल करून घेतली. इल्लूच्या बायकोने सुरणाची भाजी केली आणि दोघांनी ती खाऊन टाकली. मल्लू घरी गेल्यावर चांदण्यात बसून तो दगड खालीवर करून पाहू लागला, तेव्हां त्याला दगडाला एक चीर गेलेली दिसली आणि आत काही चमत्कारिक... कल्यासारखा भास झाला. त्याने काळजीपूर्वक तो दगड उघडून पाहिला तेव्हां त्याला आत सोन्या चांदीचे दागिने दिसले.

मल्लूने [illegible] राजाची मर्जी होती म्हणून त्याला राजाने हे दागिने गुप्तपणे दिले होते. पण आपलेच नशीब बलवत्तर आहे, म्हणून ते आपल्याला मिळाले.

चार दिवसांनी दोघे महाराजांच्या आज्ञेप्रमाणे मेळाव्यात भाग घ्यायला आले. मेजवानी चालू होती. एका जागी पंगतीत मल्लू बसला होता. त्याच्या अंगावर इल्लूला दिलेले सोन्याचे दागिने पाहून राजाला आश्चर्य वाटले. त्याने त्याला विचारले–"तुला हे दागिने कोठे व कसे काय मिळाले रे?"

मल्लूने घडलेली गोष्ट जशीच्या तशी सांगितली. इल्लूने स्वखुशीने टाकून दिलेला दगड त्याने कसा उचलला आणि सुरणाच्या कांद्याबरोबर इल्लूने दगडाची अदला बदल कशी करून घेतली ते सांगितले. इल्लूने माफी मागितली व राजाने त्याला क्षमापण केली. परंतु राजाला मल्लूला फुकटात मिळालेले दागिने पाहून राग आला. म्हणून राजा मेजवानी संपल्यावर त्याला बोलावून म्हणाला–"तू इल्लूपेक्षा जास्त समजूतदार निघालास म्हणून तुला मी ही अंगठी बक्षिस देतो. ही तू संभाळून ठेव आणि एका आठवड्यानंतर पुन्हां मी बोलवीन तेव्हां घेऊन येऊन मला दाखव. परंतु जर का तू ती दाखविली नाहीस तर तुझे डोके उडविले जाईल."





राजाने आपल्यावर राग काढण्यासाठी हा उपाय केलेला दिसतो आहे हे मल्लूने ओळखले. तरी काही बोलला नाही व ती अंगठी कोणाच्या नजरेस पडू नये यासाठी त्याने ती लपवून ठेवण्याचे ठरविले.

रात्री त्याची बायको व मुले झोपी गेल्यावर त्याने घराच्या भिंतीला एक लहानसे भोंक करून त्यात अंगठी ठेवली व ओली माती करून भोक बुजलेले कळणार नाही अशा तऱ्हेने बुजवून सारखे करून ठेवले. उजाडण्यापूर्वी ओली माती वाळून गेली, म्हणून बुजविल्याचे चिन्हसुद्धा राहले नाही. तेव्हां त्याला जिवाला धोका नसल्याचे समाधान वाटले.

[illegible] कोला बोलवून सांगितले की तिच्या नवऱ्याने घरात अंगठी कोठे लपवून ठेवली आहे ती हुडकून आणून दिली तर तिला पुष्कळसे सोने इनाम म्हणून दिले जाईल. त्याने तिला बजावून ठेवले की अंगठीची किंवा ती हुडकून दिल्याबद्दल मिळालेल्या इनामाची गोष्ट तिच्या नवऱ्याला कळता कामा नये. एकदम इतके सोने कोठून मिळाले हे मागाहून जेव्हां त्याला कळेल तेव्हां तो आश्चर्यचकित होईल.

मल्लूच्या बायकोला राजाच्या मनातला खरा हेतू तिच्या नवऱ्याचा जीव घेण्याचा होता हे माहीत नव्हते. म्हणून तिने घरी गेल्यावर नवऱ्याचे कपडे, पेटी वगैरे सर्व जागा हुडकून पाहिल्या, परंतु तिला ती अंगठी सांपडली नाही. म्हणून रात्री नवरा आल्यावर तिने नवऱ्याला विचारले–"कां हो, तुमच्याजवळ जी अंगठी आहे ती आम्हांला सुद्धा कळू नये अशी ठेवली आहेत वाटते लपवून?"

मल्लूला बायकोने अंगठी पाहिली असावीशी वाटले. म्हणून एवढेच म्हणाला– "भिंतीत लपवून ठेवली आहे."

दुसऱ्या दिवशी मल्लू कामावर निघून गेला तेव्हां त्याच्या बायकोने घराच्या सर्व भिंती लक्षपूर्वक पाहिल्या आणि जिथेजिथे [illegible] पाहिली. शेवटी एका जागी अंगठी सांपडलीच. तिने ती लगेच राजाला नेऊन दिली.

राजाने अंगठी ठेवून घेतली आणि तिला वचन दिल्याप्रमाणे पुष्कळसे सोने बक्षिस म्हणून दिले. ती आनंदाने ते सोने घेऊन घरी आली आणि घराच्या परसात एक बेताचा खड्डा खणून तिने ते सोने पुरून ठेवून दिले.

बरोबर एका आठवड्यानंतर राजाने नोकराला मल्लूकडे पाठवून अंगठी घेऊन यायला सांगितले.

मल्लूने खुणेच्या जागी भिंत खणून पाहिली पण तेथे अंगठी नव्हती. तो एकदम ओरडला–"आपले आयुष्य आजच संपणार!"

त्याने बायकोला बोलावून, तिने अंगठी कोठे पाहिली आहे का विचारले. परंतु नवरा मारील या भीतीने तिने अंगठीची गोष्ट नवऱ्यापासून लपवून ठेवली. मल्लू निराश होऊन राजाकडे गेला. म्हणाला– "महाराज! माझी अंगठी कोठे दिसत नाही."

राजा म्हणाला–"तरमग, तुला शिक्षा भोगावीच लागणार!"

मल्लू हात जोडून म्हणाला–"मला शिक्षा कबूल आहे. पण एका दिवसाची मुदत दिलीत तर हवी आहे. मी आपली कामे उरकून घेतो व शिक्षा भोगण्यास तयार होऊन हजर होतो."



राजाने एक दिवसाची मुदत दिली व म्हणाला—"उद्यां सकाळच्या आंत अंगठी आणून दाखविली नाहीस तर चांडाळाला तुझ्याच घरी पाठवीन."

मल्लू अत्यंत दु:खी होऊन घरी गेला. त्याने विचार केला की उद्यां मरावेच लागणार. आज ओढ्यावर जाऊन एखादा मोठा मासा पकडून खावा आणि मनातली एवढी इच्छा तरी पुरी करून घ्यावी. त्या-प्रमाणे त्याने गळ आणून पाण्यात टाकला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे एक मासा गिळात अडकला. मल्लूला फार आनंद झाला. त्याने घरी जाऊन स्वत:च मासा कापून शिजवून खायचे ठरविले व बायको येण्यापूर्वी सुरी घेऊन मासा कापला. परंतु त्याचे भाग्य बलवत्तर होते, म्हणून माशाच्या पोटातून अंगठी बाहेर आली. तो अंगठी हातात घेऊन मोठ्याने ओरडला—"माझे आयुष्य वाढले! अंगठी सांपडली."

तो तसाच "आयुष्य वाढले, अंगठी सांपडली!" असा ओरडत राजाकडे गेला आणि [illegible] म्हणाला— महाराज! ही घ्या अंगठी! आतां माझी शिक्षा रद्द करावी."

मल्लूच्या पाठोपाठ मोठी गर्दी राज-वाड्यात शिरली होती. राजाने सर्वांसमक्ष त्याची शिक्षा रद्द केली. परंतु ती अंगठी मल्लूला मिळाली कशी, हे राजाला कळले नाही. त्या दिवसापासून मल्लूच्या विरुद्ध काही न करण्याचे राजाने ठरविले.

झाले असे की मल्लूच्या बायकोने अंगठी आणून दिल्यावर राजाने ती अंगठी उशा-जवळच्या तिवईवर ठेवून दिली होती. त्या दिवशी रात्री एक उंदीर तिवईवर आला व त्याचा धक्का लागून अंगठी पाण्याच्या मडक्यात पडली. दुसऱ्या दिवशी सकाळी राजाच्या नोकरांनी नित्याप्रमाणे मडक्यातले पाणी ओढ्यात फेंकून दिले आणि मडके धुवून ताजे पाणी भरून ठेवून दिले. राजाला ती गोष्ट माहीत नव्हती. म्हणून मल्लूला अंगठी कशी मिळाली हे राजाला कळले नाही व त्याला कल्पनापण करतां आली नाही.



असे कां?

एका गांवी श्यामराव नावाचे इनामदार रहात असत. त्यांना स्वत:चीच फिकीर जास्त असे. इतरांच्या सुखदु:खाची किंवा नांवलौकिकाची पर्वा नसे.

त्या गांवी सोमू नांवाचा एक गरीब तरुण मनुष्य रहात असे. तो शेजारपाजारच्या लोकांना होईल तेवढी मदतच करी. म्हणून गांवकरी त्याची विचारपूस करीत. सोमूने कोणाकडून उपकाराची फेड म्हणून कधी अपेक्षा ठेवली नाही.

एकदा सोमूला परगावी जावे लागले तेव्हां गांवभर लोक परस्परांना विचारीत, सोमू कोठे गेला? ठाऊक? कोठे आजारी बिजारी तर नाही पडला?"

ते ऐकून श्यामराव इनामदारांना आश्चर्य वाटले. त्यांच्या बायकोनेपण एकदा त्यांनाच विचारले—"काय हो, सोमू, बरेच दिवस झाले, दिसला नाही!"

लोकांच्या कृपेवर पोट भरणाऱ्या सोमूची एवढी चवकशी गावकरी करतात आणि सौभाग्यवतीपण करते हे पाहून श्यामराव विचार करू लागले, असे का?"


त्यांनी, स्वत: परगावी जाऊन लोक आपली अशीच चवकशी करतात का पाहण्याचे ठरविले आणि एक आठवडाभर परगावी निघून गेले. परंतु परत आल्यावर त्यांना कोणी विचारले नाही की इनामदार, इतके दिवस कोठे दिसलात नाही वगैरे! त्याच वेळी रामू नावाचा एक शेतकरी समोरून येतांना दिसला. इनामदारांनी त्याला विचारले—"काय रे, गावातली काही खबरबात?"

"अहो, कळले का तुम्हांला? सोमू कालच परत आला!" रामू म्हणाला.

"मी एक आठवडाभर गावात नव्हतो रे!" इनामदार म्हणाले.

"असे होय! पण कोणी काही म्हणाला नाही!" रामू म्हणाला.

इनामदारांच्या तरी लक्षात आले नाही का हा फरक असा कां?



अमरवाणी

उत्तमम् स्वार्जितम् वित्तम्,
मध्यमम् पितुरार्जितम्,
अधमम् भ्रातृवित्तंच,
स्त्री वित्त मधमाधमम् ॥ १ ॥

[स्वत: मिळविलेले धन उत्तम प्रतीचे धन असते; पैतृक संपत्ती मध्यम प्रतीचे धन असते; भावाची मिळकत अधम प्रतीचे धन असते आणि स्त्रीचे धन हे अधमात अधम धन होय !]

उत्तमम् कुल विद्याया,
मध्यमम् कृषि वाणिजात्,
अधमम् सेवकावृत्तेः,
मृत्यु श्चौर्योपजीवनात् ॥ २ ॥

[विद्यार्जन हे उपजीविकेचे उत्तम साधन, कृषिवाणिज्य मध्यम दर्जाचे आणि कोणाची सेवा अधम दर्जाचे (आहे.) परंतु चोरीचा धंदा करून जगण्यापेक्षां मरण आलेले (श्रेयस्कर होय) !]

उत्तमे क्षणकोपस्यात्.
मध्यमे घटिकाद्वयम्,
अधमे स्या दहोरात्रम्,
पापिष्ठे मरणांतकम् ॥ ३ ॥

[उत्तम माणसाचा राग क्षणभर टिकतो; मध्यम माणसाचा दोन घटकाभर राहतो; अधम माणसाचा राग एक दिवस् व रात्रभर असतो; परंतु जो पापी मनुष्य असतो त्याचा राग मरेपर्यंत टिकतो.]

यक्ष पर्वत

[७]

[मांत्रिक व केसाळ भूत दोघांना हुडकत निघालेले खड्गवर्मा आणि जीवदत्त शत्रू न दिसल्याने गुहेत निराश होऊन बसले नाहीत. गुहेत त्यांना चोरवाट सांपडली आणि त्या वाटेने ते चालत चालत गुहेच्या दुसऱ्या टोकाला आले. तेथे त्यांना एक जुनाट पडके नगर दिसले. त्या नगरातल्या पुजारीणीने खड्गवर्मा आणि जीवदत्त दोघांना धरून घेऊन यायला मांत्रिकाला आज्ञा केली आणि तो निघाला. पुढे–]

त्या जुनाट पडक्या नगराकडे आश्चर्यचकित होऊन पहात जीवदत्त हे नगर कोणत्या काळातले व याची अशी दुर्गत कां झाली असावी या विषयी विचार करू लागला. परंतु खड्गवर्माच्या मनात त्या मांत्रिकाला आणि त्याच्या बरोबरच्या त्या केसाळ भुताला ठार करून त्या गुहेतून लवकर निघून जावे हा एकच एक विचार येत होता, दोन तीन मिनिटे दोघे आपल्याच विचारात गर्क होऊन मौन उभे होते. त्याच वेळी ते उभे होते त्या जागेच्या दगडी भिंतीवर कोणती तरी जड वस्तू जोराने येऊन आदळल्याचा 'धम्म' असा आवाज झाला.

तो आवाज ऐकताच खड्गवर्मा चटदिशी उठून उभा राहीला व जीवदत्तला म्हणाला–



"जीवदत्त! कसला रे तो आवाज? ते दोघे दुष्ट आपल्यावर चोरासारखे हल्ला करण्याच्या विचारात आहेत की काय ?"

"त्या मांत्रिकाला व त्याच्या त्या केसाळ भुताला दिवसा ढवळ्या आपल्यावर असा हल्ला करण्याची हिंमत होईल असे वाटते का तुला? तरी आपण सावध राहीले पाहिजे." असे म्हणत जीवदत्त भिंतीजवळ जाऊन पाहू लागला. त्यांनी भिंतीवरून पलीकडे डोकावून पाहिले त्याच वेळी मांत्रिक त्या भिंतीवर उडी मारून चढून दरडावून म्हणाला—"या रे मानवांनो! तुम्हां दोघांना केसाळ भुतासमोर आता बळी [illegible] तलवार दोघां वर फेकली.

खड्गवर्माने आपल्या तलवारीने मांत्रिकाने फेकलेली तलवार बाजूला ढकलून दिली व म्हणाला—"मूर्ख मांत्रिका! तू बळी देणार कोणाचा? स्वतःच मृत्यूच्या मुखात उडी घेतली आहेस." असे म्हणत त्याने मांत्रिकाचा हात धरून त्याला खाली ओढले. मांत्रिक 'ओय ओय' ओरडत खाली आदळला. त्याला उठवेच ना.

भिंतीच्या या बाजूला ही गोष्ट चालू असता पलीकडे कोणी तरी बोलल्याचा भास झाला—"अरे, खुळचा मांत्रिका! त्यांना ठार करू नकोस! पुजारिणीने त्यांना जिवंत धरून आणायला नव्हते का सांगितले?"


मध्यंतरी त्याच्या गुरूवर आलेला प्रसंग माहित नसल्यामुळे केसाळ भूत "बळी, बळी" असा ओरडत माकडासारखा उडी मारून भिंतीवर चढून उभा राहला.

आपल्या गुरूला जमिनीवर तळमळत पडलेला पाहून केसाळ भूत माकडासारखे 'किचकिच' करीत असतां जीवदत्तने त्याला त्याचे दोन्ही पाय धरून खाली ओढले व ते खाली पडू लागल्याबरोबर त्याच्या कंबरेत इतक्या जोराने लाथ मारली की ते कंबरडे मोडून खाली पडले. नंतर खड्गवर्माला [illegible] प्रदेशात सर्वच मांत्रिक दिसत आहेत. भिंतीपलीकडला आवाज तू ऐकलासच. आपण त्या पडक्या घरांमध्ये कोठे तरी त्यांच्या दृष्टीआड निघून जाऊ या."

त्याप्रमाणे दोघे त्या पडक्या घरांकडे धावले. एका दारात उभे राहून मांत्रिकांची टोळी पाठीमागून येत तर नाही हे पाहून घेतले. त्यांना भिंतीजवळ दोन्ही हातांनी कंबरडे धरून कण्हत उभे असलेले केसाळ भूत आणि उठता येईनासे झाले म्हणून दोन्ही हात जमिनीवर आपटीत आणि ओरडत पडलेला मांत्रिक त्या दोघांशिवाय आणखी कोणी दिसला नाही.

"भिंतीपलीकडून आलेली सूचना ऐकलीस ना तू? त्या सूचनेवरून आपल्याला या पडक्या इमारतीत राणीसारखी राहणारी पुजारिणी कोठेतरी राहते आहे आणि तिने आपल्याला ठार करू नका, असे सांगितल्याचे कळले. तेव्हां आपण सावधगिरीने ती पुजारिणी कशी काय आहे व कोठे आहे हे पाहून तिलाच धरता आले तर पाहू या." जीवदत्त म्हणाला.

त्यानंतर दोघे, शत्रू कोठून अचानक हल्ला करतात याचा अंदाज लावीत जागच्या जागी उभे राहीले. परंतु कोठून ही शत्रू येत असल्याची चाहूल लागली नाही. केसाळ भूत व मांत्रिक आपल्या नशिबाला दोष देत तडफडत होते. त्या आवाजा-





शिवाय इतर कोणता ही आवाज त्यांना ऐकू आला नाही.

खड्गवर्मा, दोघे उभे होते त्या दाराकडे लक्षपूर्वक पाहून म्हणाला–"जीवदत्त! ही लाकडी बळकट दारे पाहिलीस का? या दारांपलीकडे इमारतीत जायला नक्कीच वाट असणार. उघडून पाहू या का?"

"त्याशिवाय दुसरे करण्यासारखे आहे तरी काय? त्या मांत्रिकाला आणि त्या भुताला त्यांच्या नशिबावर सोडून देऊ या आणि इतर कोण कोठे आहेत, हे पाहूं या. दारे जरा सावधगिरी बाळगूनच उघडली पाहिजेत. कारण मांत्रिकांची टोळी दारां-

[illegible] धरून बसली असेल."

खड्गवर्माने एका हातात तलवार उपसून धरली आणि दुसऱ्या हाताने दार जोराने लोटले. परंतु दारांचा 'किरकिर' असा थोडा आवाज झाला, तरी ती उघडली मात्र नाहीत.

"दारे आंतून कडी लावल्यामुळे बंद असतील. परंतु ते आपल्या लक्षात कसे काय आले नाही?" असे म्हणत जीवदत्तने दोन्ही हातांनी खूप जोराने दोन्ही दारे लोटली. तेव्हां जोराने 'खाड्कन्' करीत दारे एकदम उघडली.

दोघे उंबरठा ओलांडून आत गेले. ते एक मोठे अगदी रिकामे दालन होते. त्यात गेल्या कित्येक वर्षात कोणी मनुष्य राहिल्याचे चिन्ह सुद्धा दिसत नव्हते. जिकडे पहावे तिकडे जळमटे होती आणि लोंबकळायला जागा होती तेथे वटवाघळे लोंबत होती. दालनाच्या टोकाला एक दार मोडकळीस येऊन सरकलेले आणि सताड उघडे असलेले दिसले.

"आतां वाट पाहण्यात अर्थ काय? गळ्यापर्यंत बुडल्यावर पाणी थंडगार आहे म्हणत पडून राहण्यात काही अर्थ आहे का? या पडक्या इमारतीतल्या कोणत्या तरी खोलीत मांत्रिकांची राणी ती पुजारीण असेलच." जीवदत्त म्हणाला.


[illegible] गेले. ते एक जास्तच भयकर स्थितीत असलेले दालन होते. त्या दोघांना आलेले पाहून चार पाच घुशी 'हुक' 'हुक' करीत खोलीत इकडे तिकडे घाबरून पळू लागल्या. घारी एवढे मोठे गलेलठ्ठ झालेले एक वटवाघूळ बाणासारखे खालीं जमिनीवर येऊन एका घुशीला उचलून घेऊन वरच्या एका उघड्या खिडकीतून बाहेर उडून गेले.

"बाप रे बाप! केवढ्या मोठमोठ्या घुशी आहेत रे! या पडक्या इमारतीत राहून काय खाऊन या घुशी अशा टरटरून फुगल्या असतील?" खड्गवर्मा म्हणाला.

"मला वाटते, पुजारिणी आपल्या शिष्यांपैकी निरुपयोगी ठरलेल्यांना खंडखंड करून कापून यांना खायला घालीत असावी!" असे म्हणत जीवदत्त जोराने हंसला आणि पुढे म्हणाला–"चल पुढे जाऊं, आणखी कोण कोणत्या गंमती पहायला मिळतात कोण जाणे?"

दोघे असेच काही वेळ एका दालनातून दुसऱ्या दालनांत जात जात जेथे जेथे पायऱ्या होत्या तेथे तेथे वर चढून पहात पुष्कळ फिरले. परंतु कोठे देखील त्यांना मनुष्य वस्ती असल्याचे चिन्ह दिसले नाही.

"खड्गवर्मा! सर्व मांत्रिक त्यांच्या मालकिणीची आज्ञा पालन करण्यासाठी फार सावधपणे आपल्या पाठोपाठ गुपचुप येऊन आपल्याला निसटता येणार नाही





अशा जागी आपल्यावर एकदम हल्ला करणार असावेत. आपण कोठून आलो आणि कोठे जातो आहो हे देखील कळेनासे झाले आहे." जीवदत्त म्हणाला.

"परत जायचे म्हणतोस का?" खड्ग-वर्माने विचारले.

"नाही तर काय? या पडक्या इमारती-तून परत उजेडात जायचे म्हणजे गुहेतून पार जाण्याशिवाय वाट आहे कोठे? तिकडे परत जाता आले तर पाहू या." जीवदत्त म्हणाला.

"आपण परतून त्या कण्हत पडलेल्या मांत्रिकाला आणि कंबरडे धरून बसलेल्या भूताला जाऊन त्यांच्या मालकिणीविषयी विचारून तरी घेऊ या!" खड्गवर्मा म्हणाला.

असा विचार करून ते परतले आणि पलीकडच्या दालनात पाऊल टाकणार इतक्यात अकस्मात् त्यांच्या डोक्यात जोराने काठ्या पडल्या. दोघांना घेरी आल्यासारखे झाले आणि दोघे खाली पडले. त्या पाठो-पाठ पुजारिणीचे चार नोकर समोर आले आणि घाई घाईने डोक्याला कोठे जखम तर पडली नाही ना पाहू लागले. परंतु कोठे रक्त वगैरे आल्याचे त्यांना दिसले नाही.

"नशीब आपले! या दोघांची डोकी फुटून दोघे मेले की काय मला भीती वाटत होती! तसे झाले असते तर महाशक्ति-शालीनी पुजारिणीच्या हाती आपल्याला नक्कीच मरण लिहिलेले होते!" असे एक नोकर दीर्घ श्वास सोडीत म्हणाला.

"जोराचा तडाखा बसला तरी डोके फुटून मरण येऊ नये, म्हणूनच तर काठ्यांना आपण फडकी गुंडाळून ठेवली होती! बरे तर बांधा यांचे हात पाय आणि यांना घेऊन चला खांद्यावर" दुसरा नोकर म्हणाला.

बेशुद्ध स्थितीतच जीवदत्त व खड्गवर्मा दोघांचे हात पाय बांधून त्यांना खांद्यावर घेऊन पुजारिणीचे नोकर निघाले आणि [illegible] एका मोठ्या मंडपात आले.

मंडपाच्या मध्यभागी एका उच्च आस-नावर एक मऊ गालिचा घातलेला होता. त्यावर पुजारिणी बसलेली होती. बाजूला काही नोकर हात जोडून पुजारिणीच्या आज्ञेची वाट पहात उभे होते. तिने खड्ग-वर्मा व जीवदत्त दोघांकडे हळूच तिरप्या नजरेने एकदा पाहिले व एकदम डोळे वटारून पहात म्हणाली–"ए महाभूता! यांच्या पैकी एक जण मांत्रिक दिसतो आहे रे!"

"शक्य आहे, महाशक्तिशालिनी पुजा-रिणी! त्याच्या हातात मंत्रदंड सुद्धा होता. या दुसऱ्याच्या हातात एक लांबलचक तल-वार होती." एक नोकर म्हणाला.

"कोठे आहेत त्या वस्तू? कोठे टाकून दिल्यात तुम्ही?" पुजारिणीने दरडावून विचारले.

"यांना आम्ही धरून पकडून आणले तेथेच सोडून आलो." तो म्हणाला.

"जाऊन घेऊन या तर! मूर्ख कोठले!" डोळे वटारून पहात पुजारिणी म्हणाली.

पुजारिणीच्या आज्ञेप्रमाणे दोघे नोकर धावत गेले आणि थोड्याच वेळात परत येऊन त्यांनी जीवदत्तची कुबडी व खड्ग-वर्माची तलवार पुजारिणीसमोर ठेवली. पुजारिणीने लक्षपूर्वक त्यांच्याकडे पाहिले



व म्हणाली–"या दोन्हीत काही विशेष मंत्रशक्ती असेलसे दिसत नाही. या दोघांना अंधार कोठडीत नेऊन टाका आणि त्यांची कुबडी व तलवारजवळ ठेवून या. पुढे काय होते ते पाहू या."

दोघांना बेशुद्धावस्थेतच एका अंधार कोठडीत नेऊन टाकून नोकरांनी बाहेरून कडी लावून घेतली.

पाव तासाभराने जीवदत्त व खड्गवर्मा दोघे शुद्धीवर आले. जीवदत्तला पहिल्याने शुद्ध आली. त्याने जीवदत्तला हलवून जागे केले व म्हणाला–"अरे खड्गवर्मा! आश्चर्य! अजून आपण जिवंत आहों रे! आपली शस्त्रे सुद्धा आपल्याजवळच आहेत.

खड्गवर्माने त्या खोलीत त्याला कोठे काही दिसते का चारीबाजूला दृष्टी फिरवून पाहिले व म्हणाला–"आपल्याला असे जिवंत राहू देण्यात पुजारिणीचा नक्कीच काही तरी हेतू असला पाहिजे."

"त्या पुजारिणीला प्रत्यक्ष पाहल्याशिवाय ते कळणे शक्य नाही. आपण प्रथम येथून बाहेर निघाले पाहिजे." असे म्हणत जीवदत्त उठून उभा राहला.

"त्या गुलामांनी आज आपली चांगलीच खोड मोडली. पुन्हां त्यांच्या हातांत आपण पडलो..."

खड्गवर्माच्या तोंडचे ते वाक्य पुरे होण्यापूर्वीच भितीपलीकडून सिंहगर्जना ऐकू आली. ती ऐकून खड्गवर्मा जागच्या जागी दचकून म्हणाला–"त्या गुलामांच्या मनात आपल्यावर सिंह सोडण्याचा विचार तर नसेल?" असे म्हणत तो हंसला.

"तसे झाले तर बरेच झाले. आपण त्या सिंहाचा प्रयोग त्यांच्यावरच करू या आणि या पडक्या जुनाट इमारतींची त्या [illegible] कायमची दहशत असेल असे काही [illegible] करू या." असे म्हणत जीवदत्तने आपली कुबडी जोराने पहारीसारखी भितीवर आपटली. वीज पडावी असा धक्का भितीला बसला आणि एक मोठे भोक पडले. सिंह घाबरून गेला आणि घाबरलेल्या कुत्र्यासारखा शेपटी दाबून भितीला टेकून बसला.

"हे वनराज! तुला आज पोटभर खायला मिळणार आहे रे!" असे म्हणत जीवदत्तने त्यांच्या खोलीला जे दार होते त्याला कुबडीने दोन ठोसे मारून फोडले. दारे धाडकन् पलीकडे जाऊन पडली.

त्याच वेळी पुजारिणीचे दहा बारा नोकर "कैदी पळत आहेत रे!" असे ओरडत पुढे आले. जीवदत्त धावत सिंहाजवळ गेला आणि कुबडी त्याच्या अंगाला लावून पुजारिणीच्या नोकरावर उडी मारायला त्याने सिंहाला खूण केली. त्याप्रमाणे सिंहाने गर्जना करून नोकरांच्या अंगावर उडी मारली.





राक्षस विवाह

विक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो झाडाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले आणि नेहमीप्रमाणे मौनपणे स्मशानाच्या दिशेने चालू लागला. तेव्हां प्रेतात बसलेला वेताळ त्याला म्हणाला–"राजा! तू कोणाच्या शब्दावर विश्वास करून या अपरात्रीच्या वेळी इतके कष्ट सहन करीत आहेस, कोण जाणे; परंतु सिंहपुरीचा राजा विजयवसंत याच्यासारखे शब्द देऊन तो मोडणारे सुद्धा या जगात आहेत. तुला कंटाळा येऊ नये म्हणून त्याची गोष्ट सांगतो, लक्ष देऊन ऐक." असे सांगून वेताळ गोष्ट सांगू लागला.

विजयवसंत हा एक अद्वितीय पराक्रमी वीर होता. युद्धविद्येत त्याची बरोबरी करू शकेल असा कोणी त्या काळात नव्हता. त्याला अरुणकुमारी नावाची एकुलती एक

वेताळाच्या गोष्टी



मुलगी होती. बाप जसा अद्वितीय पराक्रमी होता तशीच अनुपम सुंदरी म्हणून दूरदूर देशात तिची ख्याती होती.

राजकन्या विवाह योग्य झाली तेव्हां तिचे लग्न करून देण्याच्या प्रश्नावर राजवाड्यात व दरबारी लोकात विचार होऊ लागला. राजाने सर्व सूचना अमान्य करून असा निर्णय दिला की सर्व तऱ्हेच्या युद्धविद्यांत सर्वांना पराभूत करणाऱ्या तरुणाशीच राजकन्येचा विवाह होईल.

त्याप्रमाणे प्रधानाने स्वयंवराची सर्व तयारी करून सर्व प्रमुख राजेरजवाड्यांकडे दूत पाठविले आणि स्वयंवराची अट देखील कळविली.

स्वयंवराचा संदेश सर्व देशांत पोंचला. परंतु शाकलपुरीला संदेश [illegible] नाही. कारण सिंहपुरी आणि शाकलपुरी यांचे हाडवैर होते.

परंतु शाकलपुरीचा राजकुमार कमलशेखर याच्या मनात लग्न करावयाचे तर ते अरुणकुमारीशीच असे होते. त्याला अरुणकुमारीच्या स्वयंवराची वार्ता आणखी एका राजकुमाराच्या तोंडी कळली. तो त्या राजकुमाराचा एक मित्र म्हणून त्याच्या बरोबर स्वयंवराला गेला.

स्वयंवराच्या दिवशी इतर राजकुमारांबरोबर कमलशेखरने देखील घोडेस्वारी, खड्गयुद्ध, गदायुद्ध, धनुर्विद्या इत्यादि प्रतिस्पर्धांत भाग घेतला आणि सर्वांचा पराभव केला.

अरुणकुमारीने त्याच्या गळ्यात वरमाळा घातली. त्यानंतर विजयवसंत कमलशेखरला प्रेमाने भेटला आणि विचारले–"कुमार! युद्धविद्येत तुझे कौशल्य पाहून मला फार आनंद झाला. तू कोणत्या देशाचा राजकुमार? नांव काय तुझे?"

"मी शाकलपुरीचा राजकुमार आहे. माझे नांव कमलशेखर." कमलशेखर म्हणाला.

शाकलपुरीचे नांव ऐकताच विजयवसंतला भयंकर राग आला. तो रागातच म्हणाला–

"तू [illegible] चालता हो! मी या खेपेस तुला जिवंतपणी सोडीत आहे."

कमलशेखरला तो अपमान असह्य वाटला. त्याला साहजिकच जास्त राग आला व तो तितक्याच जास्त उच्च स्वरात म्हणाला–"तू ठेवलेल्या अटीप्रमाणे, ती अट पुरी होतांच तुझी मुलगी माझी वधू झाली आहे. तिच्याशी मी लग्न करणार. तू कसा आड येतोस, हे मी पण पाहणार आहे." असे म्हणत त्याने विद्युत्वेगाने तलवार उपसली.

विजयवसंतने पण तत्काळ तलवार उपसली. दोघांचे खड्गयुद्ध सुरू झाले. त्या युद्धात विजयवसंतच्या ज्या हातात तलवार धरली होती त्याच हाताला जबर जखम झाली.

कमलशेखर जास्त वेळ थांबला नाही. त्याने अरुणकुमारीचा हात धरला आणि तिला आपल्या घोड्यावर बसवून घेऊन शाकलपुरीच्या दिशेने घोडा सोडला.

विजयवसंतने शाकलपुरीवर त्याच दिवशी स्वारी केली. शाकलपुरीचे सैन्य युद्धाला तयारच होते. सैन्याच्या अग्रभागी इतर शूरवीरांसमवेत अरुणकुमारीपण युद्धाला तयार होऊन आलेली पाहून विजयवसंतने युद्ध न करण्याचे ठरविले आणि पुढे येऊन आपल्या मुलीला व जांवयाला प्रेमाने भेटला. त्याने दोघांना आशीर्वाद दिला. त्याने त्याचा हाडवैरी शाकलपुरीचा जो



राजा होता त्याच्याशी सख्य करून अरुण-कुमारीचे कमलशेखरशी थाटामाटाने लग्न करून दिले आणि आनंदाने आपल्या मुलीला व जांवयाला निरोप दिला.

येथवर गोष्ट सांगून वेताळ म्हणाला– "राजा! मला हे सांग कीं विजयवसंतच्या या विचित्र वागण्याचा काय रे अर्थ? त्यानेच ठेवलेली स्वयंवराची अट पुरी करणाऱ्या राजकुमाराशी आपल्या मुलीचे लग्न करून देण्याऐवजी त्याला त्याने खड्ग-युद्धाला आव्हान केले काय आणि नंतर शाकलपुरीवर चालून जाऊन युद्ध केल्या-शिवाय आपल्या मुलीचे कमलशेखरशी लग्न करून दिले काय? याला काही अर्थ? या शंकेचे समाधान माहीत असून तू करून दिले नाहीस तर तुला माहीतच आहे, तुझ्या डोक्याची शंभर शकले होऊन तुझ्याच पायावर लोळू लागतील."

विक्रमादित्य म्हणाला–"कमलशेखरला कोणी स्वयंवराला बोलाविले नाही. म्हणून त्याला युद्धविद्येच्या स्पर्धेत भाग घ्यायलाच [illegible] हे त्याला विजयवसंतने कोणत्याही प्रकारे इजा केल्याशिवाय स्वदेशी निघून जायला सांगितले. परंतु कमलशेखरने तलवार उप-सून खड्गयुद्धास आव्हान केल्यावर विजय-वसंत युद्धाला तयार झाला, त्यात विचित्र असे काहीच नाही. म्हणून तो शाकलपुरीवर चालून गेला त्यातही काही आश्चर्य करण्या-सारखे नाही. त्याने स्वयंवर रचले होते, पण तो राक्षस विवाह झाला. म्हणून तो मुलीला सोडवून आणायला निघाला. परंतु मुलीला स्वतः युद्धाला तयार होऊन आलेली पाहून मुलीचे कमलशेखरवर प्रेम असल्याचे त्याला आढळून आले. म्हणून त्याने सूज्ञ-पणाने युद्ध थांबवून दोघांचे लग्न करून दिले. जांवयाशी वैर राखणे बरोबर नाही असे ठरवून त्याने शाकलपुरीच्या राजाशी सुद्धा सख्य करून घेतले."

अशातऱ्हेने राजाचे मौनभंग होताच वेताळ प्रेतासह अदृश्य झाला आणि पुन्हां झाडाला जाऊन लोंबकळू लागला.



तीन मूर्ख

चंद्रावती नदीकाठी लिंबोणी नावाचे एक गाव होते. त्या गावच्या गावकऱ्यांना समजूत थोडी कमीच अशी जवळपासच्या गावात प्रसिद्धी होती. लिंबोणी गावच्या लोकांना आठवड्याच्या बाजाराला जायचे झाले, म्हणजे नदीवरचा पूल ओलांडून जावे लागे.

एकदा पुलाजवळ दोघे गावकरी परस्परांना भेटले. एकाने दुसऱ्याला विचारले– "काय हो, कोठे निघालात आणि कोणत्या कामाला?"

दुसरा–"आठवड्याच्या बाजाराला, मेंढरे विकत घेऊन यायला निघालो हो!"


पहिला–"कोणत्या वाटेने परतणार?"


दुसरा–"याच वाटेने पुलावरून, कां?"

पहिला–"मी येऊं दिले तर ना?" असे म्हणत मेंढरांना इकडे तिकडे पळवीत असल्या-सारखे तोंडाने व हाताने करू लागला. लगेच त्याच्या पाठोपाठ दुसरा मेंढरांना गोळा करीत असल्यासारखे करू लागला. दोघांचे हे नृत्यनाटक चालू असतां तिसरा गांवकरी डोक्यावर दुधाची कासंडी घेऊन तिकडे आला आणि दोघांना घडले ते विचारून घेतल्यावर त्याने आपल्या कासंडीतले सर्व दूध नदीत ओतले व म्हणाला–"सांगा, या कासंडीत आतां किती दूध आहे?"

पहिला–"मुळींच नाही."

तिसरा–"तुम्हां दोघांच्या डोक्यातसुद्धां मुळीच अक्कल नाही."





व्यवहार कौशल्य

एका गावी क्षेमचंद्र नावाचा एक ज्योतिषी होता. तो लोकांचे हात पाहून त्यांचे भूतभविष्य सांगे. त्याला हात दाखवून आपले भूतभविष्य विचारून घेतले नाही, असा त्या गावच्या पंचक्रोशीत कोणी नव्हता.

हस्तसामुद्रिक ही वृत्ती मानून काम करणारे लोक क्षेमचंद्र रहात असे त्या गावात पाऊल देखील टाकीत नसत. कोणी चुकून आला की क्षेमचंद्र चार जणांसमोर त्याची परीक्षा घेऊन त्याची फजीती करून सोडी. पुन्हां त्या गावी येण्याची तो मनुष्य हिंमत करीत नसे.

असाच एकदां रामशास्त्री नावाचा एक हस्तसामुद्रिक त्या गावी चुकून आला. गावातल्या. पारावर क्षेमचंद्र त्या वेळी गावकऱ्यांबरोबर गप्पात रंगला होता.

रामशास्त्री, हात पाहून लोकांचे भूतभविष्य सांगतो हे ऐकून क्षेमचंद्रने जमलेल्या लोकांसमोर त्याच्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरू केली–"काय हो, तुम्ही कोण कोणते ग्रंथ वाचले आहेत? तुमचे गुरु कोण? हस्तसामुद्रिकातले कोण कोणते प्रकार तुम्हांला माहीत आहेत?"


रामशास्त्री नम्रपणे म्हणाले–"हे शास्त्र मला बेताचे माहीत आहे. त्या शास्त्राचे वाचन पण फार नाही. माहीत आहे तेवढेच भविष्य वर्तवून पोटापुरते मिळवितो. माझे गांव विचाराल तर गोगलगाईसारखे आपले घरदार पाठीवरच आहे."

"तुमच्या या तोटक्या हस्तसामुद्रिकशास्त्रावर भाळून जाऊन या गावची मंडळी तुमच्यावर पैशाचा पाऊस पाडतील असे वाटले होय तुम्हांला? इतके खुळे नाहीत या गावचे लोक. म्हणजे माझ्याविषयी तुम्ही काहीच ऐकले नाही असे दिसते आहे. माझ्यासारखा हस्तसामुद्रिक या [illegible] सुद्धा मिळणार नाही, लक्षात असू द्या. म्हणून आल्या वाटेने चालू लागा."

ते ऐकून रामशास्त्रीला राग आला. या माणसाची घमेंड जिरविलीच पाहिजे असा विचार करून ते क्षेमचंद्रला म्हणाले–"आपापल्या परीने प्रत्येकजण लहान व थोर असतोच. मी तुमच्याहून मोठा आहे असे कधीच म्हटले नाही. परंतु तुम्ही कोणत्या आधारे मला लहान आणि हलका ठरविलेत हो? लहान थोर हा भेद प्रत्यक्ष परीक्षा घेऊनच होतो की नाही? तुम्हांला माझ्याहून जास्त कशावरून कळते हो?"

तेथे जमलेल्या लोकांना पण वाटले की रामशास्त्री म्हणतो ते खरे आहे. दोघांच्या ओळखीचा नसलेला असा एक मनुष्य असला तर त्याचा हात पाहून कोणाचे म्हणणे खरे निघते हे पहावे असे त्यांनी सुचविले.

सुदैवाने त्याच वेळी कोणी परगावचा एक गृहस्थ तेथे आला. गावकऱ्यांनी त्याला विचारले–"अहो, तुम्हांला थोडा त्रास होईल. परंतु दोघांची आज एक परीक्षा आहे. त्यात तुमच्या मदतीची गरज आहे. आपण या दोघांना आपला हात दाखविण्याची कृपा करावी."



त्या गृहस्थाने बरी गंमत आहे असा विचार करून हात पुढे केला. क्षेमचंद्र हात पाहून म्हणाला–"क्षमा करा हं. ही परीक्षाच आहे, तेव्हां खरे खरे ते मला सांगावे लागणार. आपल्याला संपत्तीचा योग आहे, परंतु तुमचा हात थोडा चिकट आहे. आपली मंडळी आपल्या आज्ञेबाहेर नाहीत."

"माझ्या तोंडावर माझा असा अपमान करता? या तुमच्या गप्पा ऐकायला मी नाही आलो येथे!" तो गृहस्थ म्हणाला.

रामशास्त्री त्यांना म्हणाला–"क्षमा करा, असे रागावू नका. काही लोकांना हस्तसामुद्रिक फक्त त्यांनाच माहीत आहे असे वाटते. मला दाखवाल का आपला

हात?" त्या गृहस्थाने हात पुढे केल्यावर तो पाहून रामशास्त्री म्हणाला–"अहो! लक्ष्मीचा वरदहस्त आहे आपल्या डोक्यावर. आपले औदार्य पाहून कोणी किती मोठा असला तरी लहान मुलासारखा आपल्याशी वागतो. पूर्वजन्मीचे पुण्य म्हणूनच आपणांला उत्तम कुटुंब लाभले आहे."

ते ऐकून तो गृहस्थ खूष झाला. म्हणाला–"काय हो, तुम्ही तर स्वत: डोळ्यांनी पाहिल्यासारखे भविष्य वर्तविलेत की! याला म्हणतात हस्तसामुद्रिक! नाही तर याने सांगितले ते! याच्या बोलण्यात शेंडाबुडखा असेल तर ना!"


रामशास्त्री पुढे म्हणाला–"माझे या शास्त्राचे ज्ञान पाहून मला आपल्या बोटातली अंगठी काढून द्यावी असे आपल्या मनात आहे. आपली दानवृत्ती जगप्रसिद्धच आहे, हो की नाही?" ते ऐकून त्या गृहस्थाला कमालीचा आनंद झाला.

रामशास्त्री ते ओळखून म्हणाला–"कान धरतो. काही चूक सांगितले का मी? अ[illegible] विचारतो!"

"छे:, नाही हो! माझ्या मनातली गोष्ट सुद्धा तुम्हांला कशी कळली, हा विचार करून आश्चर्य वाटले मला." असे म्हणत त्याने आपल्या बोटातली अंगठी काढून रामशास्त्र्याला दिली आणि निघून गेला.

जमलेले लोक रामशास्त्री हस्तमुद्रिक-शास्त्रात प्रवीण असल्याचे सांगून त्याची प्रशंसा करू लागले. क्षेमचंद्राची घमेंड जिरली आणि तो खाली मान करून काही बोलल्याशिवाय जागच्या जागी बसून राहिला.

रामशास्त्री सर्वांना म्हणाला–"मी खरे सांगू, क्षेमचंद्राला या शास्त्राचे उत्तम ज्ञान आहे, पण व्यवहार ज्ञान थोडे कमी आहे. वेळप्रसंग पाहून कसे बोलावे व कसे वागावे या गोष्टीवर थोडे ध्यान दिले तर त्याला आपल्या धंद्यात आणखी जास्त यश येईल. त्याने व्यर्थ अहंकारपण सोडून द्यावा."





वचन पालन

फार पूर्वी तुर्कस्तानात अब्दुल हमीद नावाचा एक श्रीमंत व्यापारी रहात असे. त्याच्याजवळ अरबी जातीचा एक उत्तम घोडा होता. त्याला तो घोडा फार आवडे. परंतु उतारवय आल्यामुळे घोड्यावर स्वारी करून जाणे त्याला शक्य नव्हते. म्हणून त्याने तो घोडा विकून टाकायचे मनाशी ठरविले. त्याने तो घोडा तीनशे दीनारपर्यंत विकण्याचा विचार केला. परंतु तितकी किंमत देऊन कोणी विकत घ्यायला तयार होईना.

एक दिवशी अब्दुल अजीज नांवाचा एक मनुष्य हमीदकडे आला आणि नम्रपणे सलाम करून म्हणाला–"साहेब! मी एका कुलीन घराण्यात जन्मलो आहे. परंतु गरीब आहे. आपला घोडा मला फार हवासा वाटतो. परंतु तेवढी किंमत द्यायची शक्ती माझ्यात नाही. तरी मी वचन देतो, मी परदेशात जाऊन काहीतरी व्यापारधंदा करावा म्हणतो आहे. एका वर्षात मी जे काही मिळवीन ते या घोड्याची किंमत म्हणून आपल्याला देईन. मी वचन देतो."

हमीद थोडा विचार करून म्हणाला–"ठीक, तू दिलेल्या वचनाप्रमाणे वाग म्हणजे, झाले." असे सांगून त्याने आपला घोडा त्याला दिला.

अजीज आनंदाने त्या घोड्यावर बसून आपल्या नशिबाच्या शोधार्थ निघाला.

काही काळ प्रवास केल्यावर तो एका गावी आला. त्या गावच्या राजवाड्या समोरून तो दररोज जाई येई. राजवाड्यातून त्या गावाच्या सुलतानाची नजर अजीजच्या घोड्यावर पडली. तो अरबी जातीचा सुंदर घोडा पाहून तो आपण विकत घ्यावा असे सुलतानाला वाटले.



सुलतानाने आपल्या नोकराला अजीज पाठोपाठ पाठविले आणि अजीज उतरला होता त्या धर्मशाळेत जाऊन नोकर त्याला भेटला व सुलतानाकडे बोलावून घेऊन आला. सुलतानाने घोड्याची किंमत विचारली असतां, घोडा विकणार नाही असे उत्तर देणे बरोबर होणार नाही असा विचार करून अजीज घोड्याची किंमत जरा जास्त सांगण्याच्या विचाराने म्हणाला– "हुजूर! नऊशे दीनार आहे!"

सुलतानाला ती किंमत फार जास्त वाटली, परंतु घोडा सोडून द्यावेसे वाटेना. म्हणून तो अजीजला म्हणाला–"किंमत फार जास्त सांगतो आहेस, बुवा! मला थोडा विचार करू दे. उद्यां सकाळी किंमत ठरवूं या." असे सांगून सुलतानाने अजीजला निरोप दिला.

त्यानंतर सुलतानाने आपल्या वजिरांना बोलावून कमी किमतीला घोडा विकत घेण्यास काही युक्ती आहे का विचारले. मंत्र्यांनी त्यांना सुचले ते सांगितले. परंतु सुलतानाला त्यापैकी एकही उपाय बरोबर वाटला नाही.

तेव्हां मुख्य वजीर सुलतानाला म्हणाला– "उद्यां सकाळी तो तरुण घोडेवाला आपल्याला उद्यानात भेटायला येईल तेव्हां राजकन्येला सुद्धां बरोबर आणावे व तिच्या कडूनच त्या तरुणाला विचारून घोड्याची किंमत किती हे नक्की करून घ्यावे. तो नक्कीच किंमत कमी करील. समजा, नाहीच कबूल केले तर आपण पाहून घेऊं. आपल्या परवानगीशिवाय त्याला गावाबाहेर पाऊल टाकायला मिळेल का?"


सुलतानाला तो सल्ला पसंत पडला. दुसऱ्या दिवशी सुलतानाने अजीजला उद्यानात बोलावून घेऊन यायला वजिराला सांगितले आणि राजकन्येला उद्यानात जायला सांगितले. अजीज आपल्या घोड्यावर बसून उद्यानात आला. त्याला पाहूनच राजकन्या चकित झाली. अजीज पण राजकन्येचे सौंदर्य पाहून चकित झाला. आपल्या वृद्धा[illegible] असलेल्या वडिलांच्या त्या सुंदर घोड्यावर बसण्यास अजीजसारखा सुंदर तरुणच योग्य आहे असे तिला वाटले.

ती घोड्याकडे पहात जवळ जाऊन अजीजला म्हणाली–"या घोड्याला स्वस्तात विकले नाही तर तुझ्या प्राणावर बेतेल. म्हणून येथून पाय काढून जाण्यातच शहाणपण आहे. माझ्या जवळ एक कोट आहे. त्यात अनेक दीनार भरले आहेत. माझे वडील आल्याबरोबर फार तहान लागल्याचे सांग. मी जाऊन तो कोट अंगात घालून पाणी घेऊन येते. नंतर आपण दोघे घोड्यावर बसून दूर कोठे तरी पळून जाऊ या."

तेवढ्यात सुलतान आला. अजीज त्याला म्हणाला–"हुजूर! फार तहान लागली आहे हो!" राजकन्या पाणी आणायला म्हणून निघून गेली आणि कोट अंगात घालून पाणी घेऊन आली. अजीज पाणी घेण्यासाठी म्हणून तिच्याजवळ गेला आणि तिला उचलून घोड्यावर बसविले आणि स्वतः घोड्यावर बसून त्याने घोडा भरधांव सोडला.

सुलतानाने त्या दोघांच्या पाठोपाठ आपले घोडेस्वार पाठविले, परंतु ते अजीजच्या घोड्याच्या आसपास देखील पोहंचू शकले नाहीत.

अजीज राजकन्येबरोबर आनंदाने अनेक देश फिरत राहिला. एक वर्ष संपत आले. वचन पुरे करण्याचा विचार मनात येतांच काय करावे हे त्याला सुचेना. राजकन्येने



अजीज काळजीत असल्याचे ओळखून कारण विचारले.

अजीजने, हमीदला दिलेल्या वचना-संबंधी सांगितले व म्हणाला–"या घोड्या-वर बसून मी जे काही एका वर्षात मिळवीन ते घोड्याची किंमत म्हणून देईन असे कबूल केले होते. वचन दिल्याप्रमाणे तुझा कोट व तुला पण द्यावे लागणार. परंतु तुला सोडून मी एक क्षणभर देखील जग-णार नाही."

राजकन्येने चकित होऊन विचारले–"तुझे सौंदर्य पाहून मी तुला वरले. मी आपल्या सर्व नातेवाइकांना सोडले. हमीदला यापैकी एक गोष्टदेखील माहिती नसणार. घोड्याची किंमत म्हणून हमीदला एक हजार दीनार देऊन टाकू या, त्याचे समाधान होईल."

परंतु अजीजला ते मान्य झाले नाही. काय वाटेल ते मानसिक किंवा शारीरिक कष्ट सहन करावे लागले तरी दिलेले वचन मोडता कामा नये असे त्याने सांगितले. नंतर दोघे अवधी संपतांच हमीदकडे आले. [illegible] घडलेले सर्व वृत्त थोडक्यात सांगून म्हणाला–"मी पुष्कळ दूर देशात फिरून आलो आहे. आपण दिलेल्या घोड्यामुळे मला ही राजकन्या आणि सोन्याचे दीनार शिवून ठेवलेला हा कोट मिळाला आहे. घोड्याची किंमत म्हणून दोन्ही गोष्टी आपल्याच आहेत."

हमीद उदार विचारांचा होता. वचन दिल्याप्रमाणे अजीजने वर्षभरात जे काही मिळविले ते देण्यास तो कबूल झाला. हे पाहून अजीजविषयी हमीदच्या मनात आदरभाव उत्पन्न झाला. म्हणाला–"तू वचन पाळलेस या बद्दल माझ्या मनाचे समाधान झाले आहे. हा कोट माझ्या कामाचा आहे. पण यातले दीनार आपण अर्धे अर्धे वांटून घेऊं या. ही राजकन्या तुझी प्रेमिका आहे. तिच्याबरोबर तू सुखाने संसार कर. घोडा तुझाच आहे."

त्यानंतर अजीज राजकन्येबरोबर निघून गेला. त्यांचा संसार सुखाचा झाला.





एका दिवसाचा सुलतान


[५]

हसन म्हणाला ते ऐकून खलीफाला फार आनंद झाला. म्हणाला–"हसन, तुझे निस्वार्थ प्रेम मला मिळाले त्याचा मला फार आनंद वाटतो. या क्षणापासून मी तुला माझा खास अनुचर म्हणून नेमतो. राजवाड्यात वाटेल तिकडे वाटेल तेव्हां हिंडाफिरायला तुला पूर्ण स्वातंत्र्य राहील. जुबेदा बेगमच्या महालात देखील प्रवेश करायला परवानगीची गरज नाही. मी जुबेदा बेगमच्या महालात असतांना देखील तू आलास तरी हरकत नाही."

खलीफाने राजमहालातच हसनच्या राह-ण्याची उत्तम व्यवस्था करून दिली आणि खर्चासाठी दहा हजार दीनार देवविले.

त्यानंतर खलीफा हसनचा निरोप घेऊन आपल्या दिवाणखान्यात निघून गेले. अबू अल हसन लगेच आपल्या घरी आनंदाने धावत पळत गेला आणि घडलेले वृत्त आईला सांगून म्हणाला–"अग आई! खलीफांनींच हौशी खातर हे सर्व नाटक रचले होते. बरं आतां मी जातो. दररोज येऊन भेटून जाईन." असे सांगून हसन खलीफांच्या राजमहालात परत आला.

खलीफाने केलेल्या उपकाराबद्दल हसनला परमानंद झाला, परंतु गर्व चढला नाही. तो नेहमी हास्यविनोद करून खलीफांचे मनोरंजन करी. तो दरबारातल्या सर्व अमीर उमरावांशी नम्रपणे वागे व आपल्या विनोदवृत्तीने सर्वांस खूष ठेवी. हसनला नेहमी खलीफांच्या महालात अगर जुबेदा बेगमच्या महालात खलीफा असतील तेथे रहावे लागे. खलीफाबरोबर हसन जेव्हां जेव्हां जुबेदा बेगमच्या महालात येई तेव्हां तेव्हां तो नन्हा दासीकडे चोरट्या नजरेने



पहात असल्याचे व त्याने पाहल्याबरोबर गन्ना दासीचा चेहरा लाजेने लाल झाल्याचे बेगमने दोन तीन दिवसांत ओळखले आणि संधी पाहून ती खलीफांना म्हणाली–"हसन व गन्ना परस्परांकडे प्रेमाने पहात असल्याचे आपल्या नजरेआड नसणार. त्यांचा निकाह लावून दिला तर?"

"माझ्या मनात तीच गोष्ट होती. परंतु कामाच्या गर्दीत मी विसरलो होतो. त्याच्या मनाला आवडेल त्या तरुणीशी लग्न करून देतो असे वचन देखील मी दिले. होते. गन्नाशी त्याचे लग्न करून दिले तर त्याचा संसार सुखाचा होईलसे वाटते." खलीफा म्हणाले.

खलीफांनी आणि बेगम जुबेदाने हसन व गन्ना दासीला बोलावून–"दोघं लग्नाला तयार आहां का?" विचारले.

गन्नाने स्मित करून जुबेदा बेगमचे पाय धरून आपली संमती दर्शविली.

हसन म्हणाला–"गरीब परवर! आपला हा दास आपल्या करुणासागरात गटांगळ्या खात आहे. गन्ना दासीला आपली गृहिणी करून घेण्यापूर्वी बेगम साहेबांना एक प्रश्न विचारण्याचे धाडस हा सेवक करीत आहे. परवानगी असावी."

"बोल, काय विचारायचे मागायचे असेल ते!" बेगम जुबेदा म्हणाली.

"माझ्या आणि हिच्या आवडी निवडी सारख्याच आहेत ना, प्रथम हिला विचारावे. मला काव्य, संगीत व नृत्य आवडते. हिलासुद्धा या गोष्टींची आवड नसेल तर हिच्याशी लग्न न करतां ब्रह्मचारी राहूनच मी आपली सेवा करीन." हसन म्हणाला.

जुबेदा बेगमने गन्नादासीला विचारले–"ऐकलेसना तू, याने काय विचारले ते? सांग तुला काय सांगायचे ते!"

गन्नाने होकारार्थी मान हलविली.

खलीफांनी लगेच काजीला आणि साक्षीदारांना बोलाविले. लग्नाच्या आणा शपथा लिहिल्या. तीस दिवस राजवाड्यात मेज-

[illegible]
नवदंपतीने आपला संसार थाटला.

दोघांनी मनसोक्त खाण्या पिण्यात व ऐषआरामात जवळ होते नव्हते ते सर्व धन खर्च करून टाकले. खलीफा आपल्या दरबारच्या कामात गर्क असल्यामुळे हसनला द्यायची रक्कम किती हे ठरले नव्हते. म्हणून दोघांच्यावर कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढतच गेला.

अशा स्थितीत दोघांना खलीफांकडे किंवा जुबेदा बेगमकडे जाऊन आपल्या कष्टांचे गाऱ्हाणे सांगणे बरोबर वाटले नाही. दोघे पुढे काय करायचे या विचारात खाली मान घालून तासन् तास बसून राहू लागले. शेवटी एकदां हसन धीर करून गन्नाला म्हणाला–"आपण डोळे मिटून पाण्यासारखा पैसा खर्च केला. आतां उपाशी मरण्यापर्यंत पाळी आली आहे. तरी मी खलीफांकडे जाऊन काही मागावे, हे मला आवडणार नाही. अशा परिस्थितीत एकच एक मार्ग उरतो."

गन्नाने दीर्घ श्वास सोडून विचारले–"बोला, काय तुमच्या मनात आहे ते. मी पण जिवापरीने ते करीन. आपल्याला कोणासमोर हात पसरणे जमणार नाही आणि आपल्या राहणीत ही काही बदल करतां येणार नाही."



"आणखी काय?...आत्महत्या!" हसन म्हणाला.

गन्ना दचकून एकदम ओरडून म्हणाली–"आत्महत्त्या! मी नाही तयार. तुम्हांला आत्महत्या करून घ्यायची असेल तर माझ्या मदतीशिवाय तुम्हांला ते करावे लागेल."

हसन ते उत्तर ऐकून रागावला नाही. शांतपणे म्हणाला–"अग ए पोरी! जिवंत राहणे हाच जगण्याचा एक मात्र मार्ग आहे हे मी ब्रह्मचारी होतो तेव्हांपासूनच मला माहीत आहे. तुझा हा मूर्खपणा पाहून मी इतके दिवस ब्रह्मचर्यात घालविले ते बरोबर होते, या गोष्टीची माझी खात्री झाली

आहे. तू उगाच घाई केलीस उत्तर द्यायला. मी पुरे सांगितले असते तर तू तशी मरायला नक्कीच तयार झाली असतीस. मेल्याचे सोंग करायचे आहे आपल्याला, म्हणजे सोन्याचा पाऊस पडेल, बघ!"

गन्नाने स्मित करून विचारले–"ते कसं काय?"

"ऐक, सांगतो!" हसन म्हणाला आणि पुढे सांगू लागला–"मी 'मेल्या'बरोबर मला एका चादरीत गुंटाळून माझे पाय व गुडगे काबाच्या दिशेने ठेव आणि माझ्या तोंडावर माझे पागोटे ठेवून दे. नंतर आक्रोश करून छाती बडवून मोठमोठ्याने रडू लाग. आपले केस पिंजारून कपडे फाडू लाग. तुला त्या शोकावस्थेत पाहून जुबेदा बेगम [illegible]कडे धावत येईल. रडत असतां [illegible] [illegible] घरी येऊन पडल्यासारखे कर आणि माझे एकाएकी प्राणोत्क्रमण झाल्याचे सांग आणि बेशुद्ध झाल्यासारखी पुन्हा पडून रहा. तासभर उठू नकोस. सर्व लोक तुला शुद्धीवर आणण्यासाठी निरनिराळे उपाय करतील. नंतर आपल्या घरी सोने चालून येईल."

"असे 'मरण' तर सहजी येईल की! मी तुला 'मरण' येण्या[illegible] ही सर्व मदत करीन. परंतु मी क[illegible] मरायचे ते सांगाल की नाही." गन्नाने वि[illegible]रले.


"ते सर्व त्या अल्लाला माहीत आहे! मी सांगतो तसे करीत जा म्हणजे झाले. हा पहा, मी आतां 'मरतो आहे'!" असे [illegible] हसन [illegible] [illegible] उताणा पडून राहला.

गन्नाने त्याच्या अंगावर प्रेतावर टाकतात ती चादर गुंडाळली. नंतर तिने त्याच्या तोंडावर पागोटे ठेवून देऊन त्याने सांगितल्याप्रमाणे आक्रोश करून रडू लागली. केस पिंजारून अंगावरचे कपडे फाडून छाती बडवू लागली. जुबेदा बेगम आली तेव्हां आणखी मोठ्याने ओरडून बेशुद्ध झाल्यासारखी जमिनीवर पडून राहली.

गन्नाचा तो अवतार पाहूनच जुबेदाला तिच्यावर आलेल्या भयंकर संकटाची कल्पना आली. तिने गन्नाला आपल्या मांडीवर निजवून तिला शुद्धीवर आणण्यासाठी निरनिराळ्या प्रकारे प्रयत्न करून पाहिले. मोठ्या कष्टाने तिने रात्री नवरा मेल्याचे जुबेदा बेगमला सांगितले आणि म्हणाली–"आतां मला मरण आले तरी बरे वाटेल!" नंतर बेशुद्ध होऊन पडल्यासारखी पुन्हां पडून राहली.

जमलेल्या सर्व दासी रडू लागल्या. हसन होता तेव्हां किती करमणूक होई, सांगू लागल्या आणि रडतरडत गन्नाला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्नपण करू लागल्या.

जुबेदा बराच वेळ रडत राहिली व स्वतःच्या खजिन्यातून दहा हजार दीनार गन्नाच्या घरी पाठवून देण्यास तिने सांगितले आणि म्हणाली–"गन्नाच्या यजमानांची उत्तर क्रिया उमरावांना शोभेल अशी थाटात झाली पाहिजे."





खजीनदाराने जुबेदा बेगमच्या आज्ञे-प्रमाणे दहा हजार दीनार गन्नाच्या घरी पाठवून दिले.

गन्नाला प्रेमाने पोटाशी आवळून म्हणाली–"अल्ला तुझे सर्व कष्ट कमी करील आणि तुझ्या नवऱ्याचे हिरावलेले आयुष्य तुला लाभेल असे करील."

गन्नाने शुद्धीवर आल्यासारखे दर्शवून आपल्या आंसवांनी बेगमचे हात जणुंकाही धुतले आणि आपल्या घरी निघून गेली. घरात लाकडाच्या ठोकळ्यासारखा तिचा नवरा ज्या खोलीत पडला होता त्या खोलीत हंसत खिदळत ती गेली व म्हणाली–"अहो विनोद मूर्ती! उठा आतां, 'जिवंत' व्हा! देवाने आपल्या घरी आज सोन्याचा पाऊस पाडला आहे, पहा!"

त्याने आपल्या बायकोचे अभिनंदन केले व म्हणाला–"एवढ्यात सर्व नाटक संपले नाही. आता 'मरण्या'ची पाळी तुझी. तू जुबेदा बेगमला फसविलेस तसेच आतां खलीफांना फसविण्याचे काम मला करा-वयाचे आहे. पाहू या मला ते कितपत जमते ते. लोकांना फसविणे त्यांना एकट्यालाच माहीत आहे अशी त्यांची समजूत असेल कदाचित!"

त्याने आपल्या अंगावरचे कापड काढून ते गन्नाच्या 'मृत' शरीरावर टाकले व तिचे पाय व गुडघे काबाच्या बाजूने करून ठेवून तिला बजावून सांगितले–"कोंडल्या-सारखे वाटले तरी जागचे हालतां कामा नये." नंतर तो रडक्या तोंडाने पागोटे अर्धवट बांधून आणि डोळ्यांना कांद्याचा रस चोळून रडतरडत खलीफांकडे गेला आणि ओरडत आपले कपडे फाडीत खलीफांच्या दरबारात जाऊन उभा राहिला.

आनंदसागरात पोहोत असलेल्या हसनला रडत आलेला पाहून खलीफा चकितच झाले. ते त्याच्याजवळ जाऊन त्याच्या मनाचे सांत्वन करीत त्याला विचारू लागले–"अरे, झाले काय सांग तरी?"

हसन मोठ्याने ओरडला–"गरीबपरवर! काय सांगू? अहो, गन्ना, गन्ना! आणि मोठ्याने गळा काढून रडू लागला.

खलीफांनी गन्ना मरण पावल्याचे ओळखले व त्याच्या पाठीवर हात फिरवीत त्याचे सांत्वन करू लागले. त्यांचे डोळेपण ओले झाले. म्हणाले–"हसन! अल्लाची जशी मेहरबानी असेल तसेच रहावे लागते. गन्नाचे जे आयुष्य त्याने हिरावून घेतले ते तुला लाभो. तुला इतके दिवस आनंद देऊन ती तुला एकाएकी दुःखसागरात लोटून निघून गेली. तिची उत्तर क्रिया राजकन्येला शोभेल अशा थाटाने झाली पाहिजे." असे सांगून खलीफांनी आपल्या खजिनदाराला बोलाविले व दहा हजार दीनार हसनच्या घरी पाठवून द्यायला आज्ञा केली. खजिन-दार दीनार पाठविण्याची व्यवस्था करीत असता हसन उठला आणि पुन्हां मोठ्याने गन्नाचे नांव घेऊन रडू लागला. खलीफांनी त्याला निरोप दिला.

घरी आल्यावर त्याने मढ्यासारखी पडून राहलेल्या बिचाऱ्या गन्नाला अंगावरचे कापड काढून सोडविले आणि म्हणाला–"तुलाच ही विद्या येते असे नको समजूस, मी देखील दहा हजार सोन्याचे दीनार घेऊन आलो आहे. आतां जुबेदा बेगम आणि खलीफा दोघांचा राग होऊ नये याची काळजी बाळगली पाहिजे." त्यासाठी काय करावे लागणार हे त्याने थोडक्यात समजा-वून सांगितले.





खलीफांनी त्या दिवशी फार लवकर दरबारचे काम आटोपले व जुबेदा बेगमच्या महालात जाऊन तिची एक अत्यंत विश्वास-पात्र अशी दासी मेल्याची दुःख वार्ता तिला सांगितली. त्याच वेळी जुबेदा बेगमनेपण खलीफांचा एक अत्यंत प्रिय अनुचर सोडून गेल्याची दुखवार्ता सांगितली.

खलीफा खूप जोराने हंसले व बरोबर आलेल्या मसरूरला म्हणाले–"बेगम-साहेबांना काही भ्रम झालेला दिसतो आहे. खरे काय ते सांग!"

मसरूर स्मित करून म्हणाला–"सर-कार! अबू अल हसनला काही झाले नाही, चांगला स्वतः पायाने येऊन सरकार-[illegible] त्याची बायको वारली!" तिच्या उत्तर-क्रियेसाठी खलीफांनी दहा हजार दीनार दिल्याची गोष्ट सुद्धा मसरूरने सांगितली. ते ऐकून बेगम जुबेदा चकित होऊन म्हणाली–"अहो, म्हणता काय? हसनच्या उत्तरक्रियेसाठी म्हणून मी दहा हजार दीनार दोन घटकांपूर्वीच तर पाठविले."

मेला तो हसन की मेली ती गन्ना या गोष्टीवर दोघां नवराबायकोंचा बराच वेळ वादविवाद झाला. शेवटी खलीफा मसरूरला म्हणाले–"आतां वजीरसाहेब तुम्ही स्वतः हसनच्या घरी जाऊन खरी गोष्ट काय आहे विचारून तरी या!" तो निघून गेल्यावर दोघां नवराबायकोंनीं पैज मारायचे ठरविले.

हसन कोणीतरी विचारपूस करायला येणार या विचारात असतां दुरून मसरूर येत असलेला दिसला. तो गन्नाला म्हणाला–"पहा, खरे काय ते विचारून यायला खलीफांनी मसरूरला पाठविले आहे. चटकन मर बघू!"

मसरूर येऊन पोचला त्या वेळी गन्ना मढ्यासारखी खोलीत पडलेली होती. तोंडावर रुमाल ठेऊन हसन रडण्याचे सोंग करीत तिच्याजवळ बसलेला होता. ते दृश्य पाहून मसरूरच्या डोळ्यांना पण पाणी [illegible] निघून गेला.

मसरूरच्या तोंडी गन्ना मेल्याचे ऐकून खलीफा जुबेदाला म्हणाले–"बेगम साहेब! तुम्ही हारलात पैज!"

जुबेदाला राग आला. म्हणाली–"हा मसरूर, खोटा व लबाड आहे. गन्नाला येथे रडत आलेली मी एकटचानेच नाही, माझ्या दासींनीपण स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली आहे. मला खोटी ठरविण्यासाठी तुम्ही सर्वांनी रचलेले हे कारस्थान आहे. थांबा, मी कोणाला तरी पाठवून खऱ्या खोटयाची चवकशी करविते. माझी गोष्ट खरी ठरली तर या मसरूरला फाशी झाली पाहिजे." असे सांगून जुबेदाने आपल्या म्हाताऱ्या दासीला अबू अल हसनच्या घरी पाठविले.

आणखी कोणी येते आहे का वाट पहात हसन बसला होता. त्याने दुरून जुबेदाच्या म्हाताऱ्या दासीला पाहिले व ओरडून म्हणाला–"गन्ना! आतां मी 'मरतो'!"

दासी खोलीत येऊन पाहते तो हसन मरून पडलेला दिसला आणि गन्ना त्याच्या शेजारी बसून रडत बसलेली दिसली. दासीने तिचे समयोचित सांत्वन केले आणि परत जाऊन गन्ना मेलेली नसून तिचा नवरा मेल्याचे सांगि-तले. आनंदाने जुबेदा खलीफांना म्हणाली–"प्रथम या मसरूरचे डोके उडवा पाहू!"

"मसरूर खोटा ठरला तर मी सुद्धा खोटा ठरेन. खरे काय आहे ते बरोबर दोघे



जाऊन पाहून येऊ या, चल!" खलीफा जुबेदाला म्हणाले.

खलीफा व जुबेदा बेगम दोघांबरोबर दासदासींची जणुंकाही एक फौजच निघाली.

हसन असे काही होणार हे ओळखूनच होता. तो गन्नाला म्हणाला–"आतां आपण दोघे 'मरू या'."

खलीफा व जुबेदा बेगम दोघांनी खोलीत पाऊल टाकले तेव्हां दोन प्रेते पडलेली दिसली. सर्व परस्परांकडे "म्हणजे!" अशा अर्थी पाहू लागले.

"पण पहिल्याने कोण मेले हे कसे कळायचे?" जुबेदा बेगमने विचारले.

"ते सांगेल त्याला मी दहा हजार दीनार द्यायला तयार आहे." खलीफा म्हणाले.

"मला द्या, मीच पहिल्याने 'मेलो'." म्हणत हसन उठून अंगावरचे कापड बाजूला सारू लागला.

प्रेत बोलू लागलेले पाहून जुबेदा बेगम दचकली. परंतु परिस्थिती ओळखून खलीफा [illegible] 'खोखो' [illegible] हंसू लागले व [illegible]ले– नाही रे बाबा हसन! हसून पोट दुखू लागले म्हणून मी 'मरतो आहे'."

खलीफा आपले हंसू आवरून हसनकडे पाहू लागल्यावर हसनबरोबर गन्नापण उठून बसली. दोघांनी अनुक्रमे खलीफा व जुबेदा बेगमचे पाय धरून क्षमा मागितली. हसन म्हणाला–"सरकार! मी ब्रह्मचारी होतो तोंपर्यंत मला पैशाची चणचण कधीच भासली नाही. परंतु ही गन्ना आहे ना सोने किती पोती भरून दिली तरी गिळून फस्त करते. आपला सर्व खजिना खजिनदारासकट गिळून टाकील ही."

खलीफा व जुबेदा बेगमने दोघांना माफ केले आणि प्रत्येकाला आणखी दहा दहा हजार दीनार इनाम म्हणून दिले.

हसनवर आलेले संकट खलीफांना कळले. त्यांनी जफरच्या बरोबरीने हसनला पगार ठरवून दिला.

त्यानंतर हसन व गन्ना दोघांचे पुढील आयुष्य सुखाने गेले. (संपूर्ण)





सोनेरी पक्ष्याचे अंडे

सुंदरवनात एका मोठ्या आंब्याच्या झाडावर चांदण्या रात्री एक घुबड बसलेले होते. ते सुंदर दृश्य पाहण्यात घुबड देहभान विसरून गेले असतां झाडाखाली काही तरी सरसरण्याचा आवाज ऐकू आला. घुबडाने खाली वांकून पाहिले. त्याला एक लांबलचक सांप दिसला आणि सांपाच्या तोंडात एक पक्ष्याचे अंडे दिसले. झाडाच्या मुळाशी असलेल्या एक पोकळघा जागेत सांपने ते अंडे ठेवून दिले. नंतर सांप आला त्या वाटेने निघून गेला.

रात्र उलटल्यावर घुबडाने झाडाखाली जाऊन त्या पोकळीत पाहिले तेव्हां त्याला एक सोनेरी पक्ष्याचे पिल्लूं दिसले.

ते सोनेरी पिल्लूं पाहून घुबडाला ते पिल्लू आपल्या घरट्यात नेण्याचा मोह आवरेना. त्याने प्रेमाने स्वत:च्या पिल्लासारखे त्याला वाढविले. दोन महिन्यात ते पिल्लूं पक्ष्यांच्या जातीत अद्वितीय सुंदर म्हणून प्रसिद्ध झाले. ती एक मादी होती.

त्या सोनेरी पक्ष्याशी लग्न व्हावे असे सुंदरवनातील सर्व तरुण पक्ष्यांना वाटू लागले. परंतु त्या सर्वांना नकार मिळाला.

सुंदरवनातील पक्ष्यांचा दोन तोंडे असलेला एक विचित्र पक्षी राजा होता. त्याची पट्टराणी एक लांडोर होती. तिच्या इतकी सुंदर पक्षीण दुसरी नाही अशी तिला घमेंड होती. सोनेरी पक्ष्याच्या सौंदर्याचे वर्णन ऐकून तिच्या मनात ईर्ष्याग्नी पेटला. आपले सौंदर्य वाढविण्यासाठी पुष्कळ कृत्रिम उपाय करून सोनेरी पक्ष्याला पहायला निघाली. तिचा तो नट्टापट्टा पाहून सोनेरी पक्षीण खदखदां हसली.

सोनेरी पक्षिणीला प्रत्यक्ष पाहून राणीच्या मनांत ईर्ष्याग्नी जास्तच भडकला. त्यांत ती आपल्याला पाहून हंसली याचा विचार

करून तिला जास्तच संताप चढला. सोनेरी पक्षिणीचे वाईट झाले पाहिजे, असा विचार करून तिने एका महार कावळ्याशी तिचे लग्न क[illegible]न देण्यासाठी हुकूम काढविला व ते लग्न करवून दिले. महार कावळा व सोनेरी पक्षिणीने एका झाडावर घरटे बांधून तेथे आपला संसार थाटला.

इतके झाले तरी लांडोरी राणीचा इर्ष्याग्नी थंड झाला नाही. सोनेरी पक्षिणीचा संसार महार कावळ्याबरोबर ही सुखाचा चालू असलेला तिला पाहवला नाही. तिने एक दुष्ट उपाय [illegible]. ती आपल्या नवऱ्याला म्हणाली—"काय हो, तुम्ही दररोज असे अशक्त होत चालला आहां की ऐन तारुण्यात तुम्हांला म्हातार[illegible] [illegible] दररोज एक सोनेरी पक्ष्याचे [illegible] तर पुन्हा तारुण्य येईल. तिचे [illegible]हिले अंडेच तुम्ही खा. तुम्ही आपले [illegible]पाई ने[illegible] [illegible] द्यायला."

पक्ष्यांच्या राजाने नेमलेले शिपाई सोनेरी पक्ष्याने अं[illegible] घातल्याबरोबर ते आपल्या राजाला नेऊन देऊ लागले. सोनेरी पक्षिणी[illegible] पण काही [illegible] येईना. दोघां नवरा बायकोंनी पळून दुसऱ्या अरण्यात जायचा विचार केला, परंतु ते सुद्धां शक्य झाले नाही. कारण लांडोरी राणीने पन्नास घारींना त्या दोघांवर नजर ठेवण्यासाठी नेमले होते.

एकदां घुबड सोनेरी पक्षिणीच्या घरट्याजवळ आले. तिच्यावर जो प्रसंग आला [illegible] वाटले व तिला या संकटातून सोडविण्यासाठी काही उपाय करण्याचे पण त्याने योजले.

घुबडाला पक्ष्यांच्या औषधपाण्याची चागली माहिती होती. त्याने एकदां पक्ष्यांच्या राजाचे औषधपाणी त्याला त्याचा आजार बरा केला होता. राजाचा त्याच्यावर पूर्ण विश्वास होता. परंतु राणी जवळ असेपर्यंत त्याला काही करणे शक्य नव्हते. म्हणून तिला दूर पाठविण्यासाठी काही तरी उपाय करणे आवश्यक होते.


म्हणून लांडोरीराणीचे आईबाप ज्या अरण्यात रहात असत त्या अरण्यात जाऊन त्याने सर्व पक्ष्यांना एक मेजवानी दिली आणि त्यांच्या अन्नांत काही तरी विष कालवून ठेवले. ते अन्न खाऊन त्या अरण्यातले सर्व पक्षी आजारी पडले.

ती बातमी लांडोरी राणीला कळली. तिने राजाला ती दु:खवार्ता कळविली आणि आपल्या आजारी आईवडिलांना भेटून येते असे सांगून निघून गेली.

दुसऱ्याच दिवशी घुबड पक्ष्यांच्या राजाला जाऊन भेटले. त्यावेळी राजा सोनेरी पक्ष्याचे अंडे खाण्याच्या तयारीत होता.

घुबड राजाला म्हणाले—"महाराज! थांबा, थांबा! ते ताजे अंडे दिसत नाही. फार जुने, सडलेले दिसते आहे."

"अहो, ते काल रात्रीच घातलेले अंडे आहे!" राजा म्हणाला.





"तरी खात्री करून घ्यावी, हे बरं नाही का? या पाण्याच्या पेल्यात अंडे टाकून पहा. ताजे असेल तर बुडेल, नाही तर तरंगेल!" घुबड म्हणाले.

"मला माहीत आहे ते!" असे म्हणत राजाने ते अंडे घुबडाने आणलेल्या पाण्याच्या पेल्यात टाकले; पण ते अंडे बुडले नाही आणि तरंगू लागले.

"अरे, होय कीं! तुम्ही म्हणालात तेच खरे ठरले तर! दूर नेऊन टाका हो ते!" राजा म्हणाला.

घुबडाने ते अंडे उचलून सोनेरी पक्षिणीला दिले. तिला तर आश्चर्यच वाटले. म्हणाली– "तुम्ही हे अंडे कसे काय बांधू शकलात हो?"

घुबडाने हंसत त्याने जे केले ते सांगितले. म्हणाला–"मी एक जादू केली आणि ती यशस्वी झाली. एका लहान पोराला ही जादू करतांना मी एकदां पाहिले होते. तो गोड पाण्यात अंडी घालून पहात असे. ती बुडत. नंतर तो पाण्यात मीठ विरघळवून त्यात पुन्हां ती अंडी टाकी [illegible] अंडी बुडत नसून तरंगू लागल्याचे दाखवी. मी खाऱ्या पाण्यातच राजाकरवी ते अंडे टाकविले. अंडे शिळे कुजके असल्याची राजाची खात्री झाली."

ते अंडे सोनेरी पक्षिणीच्या घरट्यात ठेवणे धोक्याचे आहे असे समजून घुबडाने ते आपल्या घरट्यात नेऊन ठेवले. तेथे त्या अंड्यातून एक सोनेरी पिल्लू बाहेर आले. एक दिवशी रात्री त्या पिल्लाला घेऊन घुबड दुसऱ्या अरण्यांत निघून गेले.

लांडोरी राणी आपल्या आईवडिलांना भेटून परत येत असतां वाटेत एका शिकाऱ्याने तिला बाण मारून ठार केले. त्यानंतर काही दिवसांनी राजादेखील मरण पावला. तेव्हांपासून सोनेरी पक्षिणीला व तिचा नवरा महार कावळा दोघांना काय-मची मुक्ती मिळाली. दोघे, घुबड निघून गेले होते त्या अरण्यात जाऊन आपल्या पिल्लांला भेटले व तेथेच घरटे बांधून राहू लागले.





हत्तींची सभा

आफ्रिका खंडातल्या एका मोठ्या सरोवराच्या उत्तरेकडील तीरावर रामोगी नावाचा एक मनुष्य आपल्या सात मुलांबरोबर रहात असे. सर्वांच्या बायका व मुले बाळे पण एकत्रच रहात. त्या सर्वांच्या लहान लहान झोपड्या मिळून एक छोटे खानी गावच झाले होते.

रामोगी वारल्यानंतर त्यांच्या रीतीप्रमाणे सर्व जमीनजुमला त्याच्या मोठ्या मुलाला मिळाला. बाकीच्या सहा जणांना आपापल्या बायको व मुलांबरोबर आणखी कोठेतरी जाऊन रहावे लागले.

भावंडांपैकी शेवटचे दोघे भाऊ जुळ्या भावंडांसारखे रहात. हिंडणे फिरणे, खाणे पिणे, झोंपणे सर्व एकत्रच. एवढेच नव्हेतर दोघांनी लग्ने केली ती सुद्धां दोघी सख्ख्या बहिणींशी केली, म्हणजे दोघांना निरनिराळे रहावे लागू नये.

दोघांनी एकाच जागी झोंपड्या बांधून रहावयाचे ठरविले आणि दोघे मिळून शेतीभाती करीत तसे करणे त्यांच्या रीतीविरुद्ध होते तरी त्यांनी, त्या गोष्टीची फिकीर केली नाही.

रामोगी रहात असे त्याच्या पूर्वेला एका मोठ्या अरण्याच्या बाजूलाच दोघे झोपड्या बांधून राहू लागले.

परंतु रीतीविरुद्ध एकत्र राहण्याचा प्रयत्न आणि एका दाट अरण्याशेजारी झोपड्या बांधण्याचा त्यांचा निश्चय, दोन्ही साहसाचीच कामे होती. त्याशिवाय अशी एक समजूत रूढ होती की ते अरण्य मंत्रवलेले जंगल आहे. त्यात मनुष्याने कधी पाऊल टाकले तर त्याला सरड्याचे किंवा एकाद्या रानटी जनावराचे रूप येते. आणखी भिण्याचे कारण म्हणजे जंगलात हत्ती रहात असत.



त्या हत्तींना पाहून मांत्रिक देखील भिऊन पळून जात असत.

अशा भयंकर अरण्या शेजारी पोधू आणि अरुवा दोघांनी शेतात ज्वारी पेरली होती,–आणि कणसे पाहून चांगले पीक येणार असे वाटू लागले होते.

एकदा अरुवा गुरांना जंगलात चरायला घेऊन गेला. पोधू बरे वाटत नव्हते म्हणून अंथरुणावरच पडून होता. इतक्यात मुले "हत्ती हत्ती" अशी ओरडू लागली. पोधू चटदिशी उठला आणि एक भाला हाताला आला तो घेऊन बाहेर गेला.

ज्वारीच्या शेतावर हत्तींचा एक मोठा कळप तुटून पडला होता. ज्वारीची कणसे [illegible] करीत होते. पोधू जंगलात थोडा एका बाजूला जाऊन मोठ्याने ओरडला. ते ऐकून सर्व हत्ती जागच्या जागी थबकले.

हत्तीने आपल्या हातातला भाला सर्व शक्ती एकवटून हत्तींच्या कळपांतल्या सर्वात मोठ्या हत्तीवर फेंकला आणि तो त्या हत्तीच्या गंडस्थलात जाऊन रुतला. तो हत्ती रागाने आणि कळा सहन झाल्याने फार मोठ्याने ओरडत जंगलास शिरला आणि त्याच्या पाठोपाठ कळपातले सर्व हत्ती निघून गेले.

पोधूने जे साहस दाखविले त्यामुळे पीक वांचले. परंतु या प्रयत्नात त्याच्या हातून एक चूक झाली. त्याने हत्तीला जो भाला मारला होता तो अरुवाचा होता. आणि पिढ्यान् पिढ्या त्यांच्या कुटुंबात वापरण्यात आला होता. तोच नेमका हत्तीबरोबर नाहींसा झाला. त्यांच्या कुटुंबात तो मंत्रवलेला भाला असल्याची समजूत होती. पूर्वी कोणी नंदी जातीच्या लोकांनी तो मंत्रवून तयार करविला होता, म्हणे. रामोगी स्वतः तयार करविलेले भालेच वापरी. वंशपरंपरागत चालून आलेला तो भाला त्याने कधी वापरला नव्हता. त्याने आपल्या सर्व संपत्तीची वांटणी करून ठेवली होती. त्यात हा भाला अरुवाच्या वांटणीला [illegible] सभाळून ठेवीत असे. पोधूने तोच भाला उचलून हत्तींचा कळप पळवून लावला होता.

अरुवा गुरांना घेऊन संध्याकाळी घरी आला तेव्हां पोधूने घडलेली चूक कबूल करून माफी मागितली. परंतु अरुवाला इतका राग आला की तो म्हणाला–"तू मेलास तरी चालेल परंतु माझा भाला मला परत मिळाला पाहिजे."

पोधूने, त्या दाट जंगलात हत्तींच्या कळपात शिरून तो भाला परत मिळविणे किती धोक्याचे आहे वगैरे गोष्टी सांगितल्या. परंतु अरुवा हट्टाला पेटला होता. म्हणाला–"माझा भाला आणून दे नाहीं तर मी तुला ठार करीन."

"ठीक, मी तुझा भाला आणून देतो, त्या प्रयत्नात प्राण द्यावे लागले तरी परत येणार नाही!" असे सांगून पोधू दुसऱ्या दिवशी कोणी उठण्यापूर्वी एक भाला खांद्यावर टाकून हत्तीच्या कळपाचा शोध काढीत निघाला. दिवसभर रानटी जनावरांपासून आपला बचाव करीत तो पुढे जात होता. रात्री एका मोठ्या झाडाच्या पोकळीत बसून त्याने बरोबर आणलेल्या भाकऱ्या खाल्ल्या आणि उजाडेपर्यंत झोपून राहला. उजाडल्यावर पुन्हा हत्तींच्या शोधार्थ पुढे निघाला. बराच वेळ चालत राहल्यावर




झाडीच्या मध्य भागी एक मोकळी जागा दिसली. तेथे एक जुनी झोपडी होती. झोपडीतून धूर बाहेर येत असलेला दिसला.

पोधू चकित होऊन झोपडीकडे पहात असतां एक म्हातारी बाहेर आली. वाळलेल्या काटक्या तोडीत ती बडबडत होती– "या म्हातारीला कोणी हातभार द्यायला असते तर!"

ते ऐकून पोधू चटदिशी पुढे येऊन म्हणाला–"आजी! मी तोडून देतो लाकडे." आणि त्याने म्हातारीच्या हातातली कुऱ्हाड मागून घेतली.

म्हातारी त्याला लाकडे फोडीत असलेला पाहून कृतज्ञतापूर्वक हंसत म्हणाली–



"कोण रे बाबा तू? देवासारखा येऊन पावलास!"

पोधूने थोडक्यात आपली सर्व कथा सांगितली.

"असले साहस दाखविणारा तूच दिसलास बाबा! तुला मदत करता येईल की नाही, मी सांगू शकत नाही. परंतु तू काही काळ लाकडे फोडून देण्याचे काम करीत येथेच रहा." ती म्हणाली.

पोधू सुमारे एक महिनाभर म्हातारीकडे लाकडे फोडून देई व ती सांगे ते काम करी. ती दररोज त्याला उणे कमी बोले पण. मधूनमधून मूर्ख, नालायक आळशी, ऐदी म्हणायलादेखील मागेपुढे पहात नसे.

... म्हातारीकडून आपल्याला काही मदत मिळण्याची लक्षणे दिसत नाहीत अशी पोधूची खात्री झाली. तो अगदी निराश झाला. अशा प्रसंगी म्हातारीने त्याला बोलावून जवळ बसायला सांगितले व म्हणाली–"तू इतके दिवस फुकट गेले असे समजू नकोस. धीर, सहनशक्ती आणि शील हे तीन गुण असल्याशिवाय माणसाला आपल्या कामात यश मिळत नाही. तुझ्यात हे तीनही गुण आहेत, या गोष्टीची खात्री करून घेतल्यावर तुला हत्तींच्या कळपांत जाऊन कार्यसिद्धी होईल असे मला वाटते. तू एका हत्तीला दुखापत केली आहेस. हत्ती कधी क्षमा करीत नाहीत. म्हणून तुला थोडी मदत होईल यासाठी एक वस्तु तुझ्याजवळ देऊन ठेवते." असे सांगून म्हातारीने एक निळ्या रंगाचा कांचेचा मणी पोधूच्या हातात दिला.

दुसऱ्या दिवशी कोणत्या दिशेने व वाटेने गेले की हत्तींच्या वस्तीत तो पोहचू शकेल हे तिने सांगितले.


म्हातारीने सांगितल्याप्रमाणे चालून पोधू चारपांच तासात हत्तीच्या वस्तीत येऊन पोचला. त्या दाट अरण्यात एक मोठे मैदान होते. मैदानाच्या चारीबाजूला किल्ल्याच्या कोटासारखी दाट झाडी होती. मोठमोठी जाड खोडाची झाडे परस्परांना चिकटून होती.

... होते. कळपात लहान थोर हत्ती व हत्तिणी होत्या. त्यांत एका लहानशा टेकाडचा सारखा एक म्हातारा हत्ती पोधूला दिसला. तो त्यांचा राजा असावा असे त्याला वाटले.

पोधू त्या गजराजासमोर खाली मान करून थरथर कापत उभा राहला.

गजराजाने काहीतरी आवाज करून म्हटल्यासारखे वाटले. "तू इकडे कशासाठी आला आहेस?" असे तो विचारीत असावा असे पोधूला वाटले, म्हणून त्याने मान वर करून सर्व हत्तींना ऐकू जाईल अशा स्वरात उत्तर दिले–"गजराजा! तुझ्या कळपाने माझ्या ज्वारीच्या शेतात शिरून नासधूस सुरू केलेली पाहून मी पिकाच्या रक्षणासाठी अविचाराने आणि निर्दयपणे तुमच्यापैकी एकाला भाला मारला. तो भाला माझ्या भावाचा होता. तो भाला मी परत आणून दिला नाही. तर मला प्राणदंड देण्याचे माझ्या भावाने ठरविले आहे. म्हणून मी तुमच्याकडे आपल्या प्राणाची भीक मागायला आलो आहे. मला तो भाला तरी परत द्या किंवा माझा जीव घेऊन या अग्निदिव्यातून माझे रक्षण तरी करा!"

बराच वेळ कोणताही हत्ती काहीच उद्गारल्यासारखे भासले नाही. परंतु काही वेळाने हत्तींचा राजा काहीतरी म्हणाल्या



सारखा भासला. इतर दोन हत्ती गुणगुणल्यासारखे वाटले. नंतर दोन हत्ती पोधूला दूर एका झाडाखाली घेऊन गेले.

त्यानंतर हत्तींची सभा सुरू झाली. बराच वेळ चर्चा होत राहली असावी. मधूनमधून हत्तींचा होकारार्थी नकारार्थी आवाज झाल्याचा भास होई. शेवटी सभा संपली. हत्ती पोधूला आपल्या राजाकडे पुन्हा घेऊन गेले. गजराज काही तरी म्हणाल्यासारखे वाटले.

हत्ती पोधूला एका झाडीत घेऊन गेले. तेथे पुष्कळ भाले पडलेले होते. पोधूने आपल्या भावाचा भाला ओळखून उचलून घेतला. त्याने सर्व हत्तींना नम्रतापूर्वक

नमस्कार केला आणि त्यांचे आभार मानून आपल्या वस्तीच्या दिशेने परतला.

परत येत असतां तो वाट चुकला की काय त्याला कळले नाही, एवढे खरे की, त्या म्हातारीची झोपडी त्याला वाटेत लागली नाही. म्हातारीने दिलेला तो निळा मणी त्याच्याकडेच राहून गेला.

भाला परत मिळाल्याबद्दल अरुवाला फार आनंद झाला. पोधूने जे पहायला किंवा अनुभवायला मिळाले, सर्व सांगून त्याला म्हातारीकडून मिळालेला निळा मणी दाखविला. सर्व तो मणी हातात घेऊन पहात त्याचे कौतुक करू लागले. नंतर मुलांनी तो मणी घेतला. खेळात अरुवाच्या लहान मुलाने तो तोंडात टाकला आणि गिळला.

झाले, तेवढ्यावर पुन्हां भांडण सुरू झाले. पोधूच्या बायकोने त्या मुलाला जोराने चार दिल्या. अरुवाची बायको आपल्या मोठ्या बहिणीला त्याबद्दल तोंडाला आले ते बोलली.

... अरुवाला म्हणाला—"अरुवा! मी तुझा भाला घालवून बसलो तेव्हां तू माझा जीव घ्यायला तयार झालास. मी प्राण-पणाने तो आणून दिला. आतां माझा हा मंत्रवलेला मणी तुझ्या मुलाने गिळला आहे. बोल, आतां तुझे काय म्हणणे आहे ते ऐकू दे!"

"उद्यां मी दुसरीकडे जाऊन आपले वेगळे बिऱ्हाड थाकारतो. कुत्री मांजरी एकत्र राहू शकतील, पण दोघे भाऊ एकत्र नांदणे मनुष्य जातीत तरी शक्य नाही, असे मला वाटू लागले आहे." अरुवा म्हणाला.

"ठीक, तुला काय वाटेल ते कर परंतु माझा मणी तुझ्या मुलाने गिळला आहे! मी त्याला आपल्याकडे ठेवून घेणार!" पोधू म्हणाला.

अरुवाला नकार देता आला नाही. त्याने आपल्या मुलाला पोधूकडे ठेवून दिले आणि दूर दुसऱ्या टेकाडावर आपले झोपडे बांधून तेथे राहू लागला.



नहुष राजा पूर्वी स्वभावाने फार चांगला होता. इंद्रपद मिळतांच तो भोग-विलासात पडला. अप्सरां बरोबर विहार करीत असता त्याला एकदा इंद्राची स्त्री शची दिसली. तिला पाहतांच तिच्याशी विहार करण्याची इच्छा त्याच्या मनात उत्पन्न झाली. आपल्याला इंद्रपद मिळाले असतां इंद्राची बायको आपली पत्नी कां असू नये असा त्याने हट्ट धरला. त्याने शचीला कळविले तेव्हां ती बृहस्पतीकडे गेली.

ते कळल्यावर नहुषाला बृहस्पतीचा फार राग आला व तो देवांना आणि ऋषींना शिव्या शाप देऊ लागला.

परस्त्रीवर नजर टाकणे महापातक आहे असे त्यांनी नहुषाला समजावून ...

"इंद्राने अशी अनेक कामे मागे केलेली आहेत. त्यावेळी तुमचा ही नीति अनीती कोठे गेली होती?" नहुषाने विचारले.

तेव्हां देव बृहस्पतीकडे गेले व म्हणाले— "शचीने नहुषाची पत्नी म्हणून राहणे मान्य केले नाही तर त्रिलोकावर मोठे संकट येईल."

"मला वाटेल त्या यातना सहन कराव्या लागल्या तरी मी त्याची पत्नी म्हणून रहायला तयार नाही." शचीने साफ सांगून टाकले.

त्या स्थितीत नहुषाचा राग शांत करण्यासाठी व शचीवरचे संकट टळावे यासाठी काही तरी उपाय करणे आवश्यक ...



बृहस्पती देवांना म्हणाला–"नहुषाला फार गर्व झाला आहे. गर्वोन्मताचे पतन हे निश्चित आहे. शचीने विचार करण्यासाठी थोडा अवधी मागून घ्यावा."

त्याप्रमाणे शची नहुषाला जाऊन भेटली आणि म्हणाली–"आपण म्हणता आहां ते विचार करूनच मी ठरवू शकेन. तरी मला थोडा अवधी द्यावा."

तिकडे ऋषी मुनींनी नहुषाच्या पापाचे खापर पूर्णपणे भरावे यासाठी त्याच्याकरवी अश्वमेध यज्ञ सुरू करविला. इंद्र नहुषाच्या तेजासमोर उभा राहू शकला नाही. शचीने त्याला भेटून पुन्हां इंद्रपद प्राप्त करण्यास

"यावेळी नहुष शक्तिशाली आहे. त्याच्या पापाचे खापर भरत आले आहे. परंतु तुझ्या मदतीने ते लवकर भरू शकेल. नहुष तुझ्यावर भाळला आहे तेव्हां तू सांगशील ते करायला तो तयार होईल. तू त्याला असे सांग की सप्तर्षींनी त्याला पालखीत बसवून तुझ्याकडे आणावे. नहुषाचे पतन होण्यास हा सर्वोत्तम उपाय आहे." इंद्राने शचीला सल्ला दिला.

शचीने नहुषाला अद्वितीय वाहनात बसून यावे असे सांगून ऋषींनी वाहून आणलेल्या पालखीत यायला सुचविले. नहुषाला परमानंद झाला. त्याने सप्तर्षींनी त्याच्या पालखीला खांदा द्यायला सांगितले. मुनी नहुषाला राग यावा यासाठी मुद्दाम हळुहळु चालू लागले नहुषाने 'सर्प' 'सर्प', म्हणजे 'लवकर चला' असे म्हणत अगस्त्य ऋषींना लाथ मारली. तेव्हां अगस्त्य ऋषींनी त्याला शाप दिला–"तूच 'सर्प' म्हणजे सांप हो!" त्याप्रमाणे नहुष स्वर्गलोकातून भूलोकात येऊन पडला आणि इंद्राला पुन्हां इंद्रपद मिळाले.

शल्याने ही कथा पांडवांना सांगितली आणि पांडवांचा निरोप घेऊन कौरवांकडे गेला.

द्रुपद राजाचा पुरोहित पांडवांचा दूत

कौरव आणि पांडवांच्या बाजूने युद्धास तयार होऊन आलेले राजे आपापल्या सैन्यासह येऊन पोचले होते.

पांडवांच्या बाजूने युद्ध करण्यास सात अक्षौहिणी सैन्य उपप्लाव्य येथे जमा झाले. महारथी युयुधान एक अक्षौहिणी सैन्य घेऊन आला. चदि देशाच राजा धृष्टकेतु आणि जरासंधाचा मुलगा जयत्सेनदेखील एकेक अक्षौहिणी सैन्यानिशी आले. पांड्य देशाचा राजा पर्वत प्रदेशात राहणाऱ्या शूर योद्धयांचे सैन्य घेऊन दाखल झाला. द्रुपद राजा अनेक देशांच्या शूरवीरांसह व आपल्या शूर पुत्रांसह फार मोठे सैन्य घेऊन आला. मत्स्य देशाचा राजा विराट गिरिजन वीरांचे एक मोठे सैन्य घेऊन आला. अनेक देशांचे राजे आपापले झेंडे उभारून कौरवांशी युद्ध करण्यास येऊन पांडवांच्या नगरीत हजर झाले.

त्याच वेळी कौरवांच्या बाजूने अकरा अक्षौहिणींचे सैन्य पांडवांशी युद्धास तयार होऊन हस्तिनापूरला आले. नरकासुराचा मुलगा भगदत्त चीन, किरात इत्यादि जातींचे एक अक्षौहिणी सैन्य घेऊन आला. त्याच प्रमाणे भूरिश्रवा आणि शल्य प्रत्येकी एक अक्षौहिणी सैन्य घेऊन आले. पल्लव पुष्प माला धारण करून हत्तीसारखे बलिष्ठ



सौवीर देशाहून जयद्रथ वगैरे थोर शूर वीर तयार होऊन आले. त्यांचे सैन्य सुमारे एक अक्षौहिणी होते. दक्षिणेकडून माहिष्मती नगरीहून नील भयंकर शस्त्रास्त्रे धारण करणाऱ्या आपल्या शूर अनुयायांसह आला. अवंतीचा राजा दोन अक्षौहिणी सैन्य घेऊन हजर झाला. कैकेय देशाचा राजा एक अक्षौहिणी सैन्यासह आला. इतर लहान थोर राजांचे मिळून तीन अक्षौहिणी सैन्य पण आले.

दुर्योधनाच्या बाजूने आलेल्या सैन्यालाच हस्तिनापूरला उतरण्यासाठी पुरेशी जागा नव्हती. ते सैन्य पंचनद, गुर्जर, रोहित-



आणि यमुनेच्या विस्तीर्ण तीरावर राहुट्या व तंबू टाकून उतरले.

अशा तऱ्हेने जागोजागी पसरलेले सैन्य पहात द्रुपद राजाचा पुरोहित हस्तिनापुरी पोचला आणि सरळ धृतराष्ट्राच्या दरबारात गेला. त्या वृद्ध ब्राह्मणाचे विदुराने, भीष्माने धृतराष्ट्राने सर्वप्रकारे आदरातिथ्य केले आणि पांडवांची कुशलवार्ता विचारली. त्या ब्राह्मणाने देखील दुर्योधनदिकांची कुशलवार्ता विचारून घेतली आणि सर्वांना ऐकू येईल व कळेल अशा स्वरात म्हणाला–

"सभासद हो! धृतराष्ट्र व पांडु दोघे सख्खे भाऊ. वाडवडिलांच्या संपत्तीवर व

आहे. तेव्हा धृतराष्ट्राच्या मुलांना त्यांच्या पित्याचे राज्य आणि पांडुपुत्रांना त्यांच्या पित्याचे राज्य उपभोगण्याचा अधिकार आहे. परंतु पांडवांना मात्र ते उपभोगण्यास मिळू नये, याचे कारण काय? पांडवांना त्यांचे राज्य उपभोगू न देता दुर्योधनाने त्यांना दिलेला त्रास तुम्हां सर्वांच्या माहितीचा आहे. पांडवांचे भाग्य बलवत्तर होते म्हणूनच ते सर्व संकटांना तोंड देऊन वाचले. पांडवांनी आपल्या स्वतःच्या शौर्य पराक्रमाने मिळविलेले राज्यदेखील त्यांना पूर्णपणे उपभोगता आले नाही. कारण त्यांच्या कारस्थानाला कपटी शकुनीने हातभार लावला. बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास पांडवांनी सपत्नीक भोगला. विराट नगरीत त्यांच्यावर जे जे प्रसंग ओढवले ते सांगण्यासारखे किंवा ऐकण्यालायक सुद्धां नाहीत. इतके असूनही पांडवांची इच्छा कौरवांशी सख्य राखण्याची आहे. युद्धामुळे प्राणहानीच होणार. काहीतरी समेटाने करावे असे त्यांना मनापासून वाटते. दुर्योधनाला त्याच्या असंख्य सैन्याचा विश्वास वाटतो आहे. परंतु तो त्याचा निव्वळ भ्रम आहे. त्याच्याकडे पांडवांपेक्षां चार अक्षौहिणी सैन्य असून उपयोग काय? पांडवांच्या सैन्यात सात्यकी, भीम, नकुल

तितक्याच अक्षौहिणी सैन्याला पुरे करून सोडील. कृष्ण त्याच्या सारखाच पराक्रमी आहे. अशा बलाढ्य पांडव वीरांशी युद्ध करून जिंकण्याची आशा, कोणत्याही बुद्धिमान माणसाच्या मनात उत्पन्न होणार नाही. पांडवांशी सख्य करून घ्यायला याहून चांगली संधी मिळणार नाही."

द्रुपदाच्या पुरोहिताने या शब्दात निवेदन केल्यावर भीष्माचार्य म्हणाले–"हे ब्राह्मणोत्तमा! आपण म्हणालात ते किती कठोर व कडू असले तरी सत्य तेच आहे. पांडवांनी युद्धाची सर्व प्रकारे तयारी करून सख्य करण्यासाठी हात पुढे करणे हे त्यांना शोभण्यासारखेच आहे. अर्जुनाने अनेक अस्त्रे संपादन केली आहेत. स्वतः इंद्र वज्रायुध धारण करून युद्धाला उभा राहला तर अर्जुनासमोर त्याला माघार घ्यावी लागेल."

भीष्माचार्य बोलत असतां मध्येच उठून कर्ण उभा राहिला आणि म्हणाला–"ब्राह्मणोत्तमा! आपण म्हणालात त्यात नवीन काहीच नाही. धर्मराज स्वतः मान्य केलेल्या अटीप्रमाणे द्यूतात आपले सर्वस्व हारून वनवासाला गेला आणि तोच मूर्खपणाने आपले राज्य परत मागतो आहे, यात काही अर्थ आहे का? पांडवांच्या बलपरा-



क्रमाला भिऊन दुर्योधन एक टीचभर जमीन देखील द्यायला तयार होणार नाही. त्यांना परत राज्य हवे असेल तर अटीप्रमाणे पुन्हां वनवास भोगला पाहिजे. राज्यासाठी ते धर्मनीती सोडून युद्धाला तयार झाले आहेत."

भीष्माचार्य चकित होऊन म्हणाले– "कर्णा! या सर्व गोष्टी व्यर्थ आहेत. अर्जुनाने एकट्याने आपणां सर्वांना किती सहज पळवून लावले होते ही गोष्ट तू विसरलास का? त्या ब्राह्मणोत्तमाने सांगितल्याप्रमाणे तू वागला नाहीस तर अर्जुनाच्या कोपाग्नीत सर्व कौरव आणि त्यांचे असंख्य सैन्य भस्म होऊन जाईल!"



मध्येच धृतराष्ट्र बोलणे आवश्यक वाटून म्हणाला–"कर्णा! असे उर्मटपणाने बोलणे तुला शोभत नाही. भीष्माचार्यांनी जे काही सांगितले आहे ते सर्वांच्या हिताचे आहे." नंतर द्रुपदाच्या पुरोहिताकडे वळून म्हणाला–"ब्राम्हणोत्तमा! मी आपले उत्तर सर्व गोष्टींचा विचार करून संजयाकरवी पांडवांकडे पाठवितो. आपण पांडवांना जाऊन तसे कळविण्याची कृपा करावी!"

द्रुपदाच्या पुरोहिताला निरोप देऊन धृतराष्ट्राने संजयाला बोलाविले आणि म्हणाला–"संजया! तू ताबडतोब उपप्लाव्य नगरीत जाऊन धर्मराजाला भेट आणि पांडवांची कुशलवार्ता विचारून सर्व संक-टा[illegible] देऊन ते [illegible] परत आले याबद्दल त्यांचे माझ्या वतीने अभिनंदन कर. नंतर कृष्णाला आणि पांडवांच्या मदतीला आलेल्या इतर प्रमुख वीरांना बोलावून त्यांना आमच्या वतीने सांग कीं, आमच्यामुळे पांडवांना फार कष्ट सहन करावे लागले. धर्मराज रागावून रुसून आमच्याशी युद्ध करण्यास तयार होऊन येत आहे हे ऐकूनच आम्हांला आश्चर्य व भय वाटू लागले आहे. भीमार्जुन दोघे अद्वितीय वीर आहेत. त्यांच्याजवळ काय बोलायचे ते तूच ठरव! परंतु युद्धाशिवाय काय होऊं शकेल ते समजावून सांग, एवढेच माझे म्हणणे आहे!"

संजय रथात बसून उपप्लाव्यला आला आणि धर्मराजाला भेटला. परस्परांची कुशलवार्ता विचारून झाल्यावर संजय सर्वांना संबोधन करून म्हणाला–

"धृतराष्ट्र महाराजांनी सख्य आणि शांती घडवून आणण्यासाठी मला आपल्या-कडे पाठविले आहे. पांडवांना जग आदर्श पुरुष म्हणून ओळखते. म्हणून राग येऊन त्यांनी काही करावे हे शोभत नाही. युद्ध करणेच गैर. आपल्या बंधुबांधवांचा वध करण्यापेक्षा स्वतःला मरण आलेले बरे. कौरवांचा वध करून राज्य प्राप्ती करून घेणे कोणत्याही परिस्थितीत हिताचे नाही. [illegible] नाही. तसेच कौरवांचे सैन्यदेखील बलशाली आहे. दोघांचे युद्ध होऊन त्यात एकाचा जय झाला तरी जिंकणाऱ्याला काय सुख मिळणार? पांडव कधी धर्म व नीती सोडून युद्ध करणार नाहीत ह्याची मला पूर्ण खात्री आहे. शांतिस्थापना कशी होईल याचा विचार करावा अशी मी धृतराष्ट्र महाराजांच्या वतीने हात जोडून विनंती करतो."

संजयाने असे निवेदन केल्यावर धर्मराज म्हणाला–"संजया! युद्धासाठी मी का आतुर आहे? शांतिस्थापनेसाठी युद्ध करण्यास सिद्ध होणारा मी मूर्ख नाही. शाहण्या माणसाने स्वतःच्या सुखाची जितकी काळजी बाळगायला हवी, तितकीच, किंबहुना थोडी जास्तच काळजी इतरांच्या सुखाची देखील बाळगली पाहिजे. दावाग्नी पेटला असता फक्त "मी मरतो आहे, मला वांचवा!" म्हणणारा मूर्खच नव्हे काय? दुष्ट दुर्योधनाची सर्व कृत्ये डोळ्यासमोर होत असतांना त्या विरुद्ध एक चकार शब्द ही न बोलता धृतराष्ट्र महाराज गप्प बसले होते. त्यांना कसे सुख मिळणार? कपटीपणाने द्यूत खेळून कौरवांनी आत्म-नाशाचे बी पेरले. तरी देखील कौरवांशी सख्य राखण्यात मला कोणत्याही प्रकारे



हरकत वाटत नाही. मी सर्व जुन्या गोष्टी विसरून जाण्यास तयार आहे. फक्त इंद्र-प्रस्थाचे राज्य मला द्यायला सांग. त्याला चक्रवर्ती राजा रहावयाचे असेल तर खुशाल राहू दे!"

संजय म्हणाला–"धर्मराज! तुला धर्मो-लंघन हे माहीतच नाही. तुच्छ राज्य लोभाने तू आपली अपार कीर्ति कलंकित करून घेणार का? तेव्हां युद्धाचा विचार मनातून काढून टाक. कौरव तुला आपल्या राज्यातला एकही तुकडा देतील असे मला वाटत नाही. युद्ध करून राज्यप्राप्ती करून घेण्यापेक्षा तू आणि तुझ्या बंधूनी याचना [illegible] धारण केल्याने तशी कीर्ति वाढेल."

संजयाने नीति अनीति व धर्माधर्म या विषयी जे त्याला सांगावयाचे होते ते सांगितल्यावर धर्मराज म्हणाला–"संजया! तू म्हणालास ते मी सर्व ऐकले. परंतु आपद्धर्म म्हणून एक असतो. संकटांत सांपडल्यावर त्यांतून मुक्ती प्राप्त करण्या-साठी अधर्म कार्य करावे लागले तरी ते कर्तव्य धर्म म्हणून करावे लागते. तो देखील धर्मच होय! तरी कृष्ण उपस्थित आहे. तो जे म्हणेल ते मी आपले कर्तव्य समजून करायला तयार आहे."

कृष्ण संजयाला म्हणाला–"तू आज सख्य आणि शांतीच्या गोष्टी करीत आहेस. क्षत्रियांनी युद्ध न करणे हा त्यांचा धर्म आहे असे का तुझे म्हणणे आहे. अधर्म करण्यास सर्व प्रकारे सिद्ध झाले धृतराष्ट्राचे पुत्र! दुर्योधनाने अनीतिपूर्वक पांडवांचे सर्वस्व हरण केले. त्यात क्षत्रियधर्म त्याने कोणता पाळला? तूच सांग? इतके दिवस त्याने पांडवांचे राज्य उपभोगिले. आतां त्याने त्यांना ते कां परत करू नये? पर[illegible] स्वत [illegible] हजारपटीने चांगले. म्हणून युद्ध करून त्यात मरण आले तरी ते आम्हांला योग्य वाटते. ही गोष्ट तू कौरव सभेत जाऊन स्पष्टपणे सांग!"

संजयाने त्याच्या हातून काही चूक झाली असल्यास क्षमा करण्याची प्रार्थना करून सर्वांचा निरोप घेतला. तो निघाला तेव्हां धर्मराज त्याला म्हणाला–"संजया! आम्हांला खरोखरच सख्य व शांती हवी आहेत. धृतराष्ट्र महाराजांना देखील सख्यच हवे असेल तर त्यांनी आमच्या राज्यातला काही भाग तरी द्यावा असे त्यांना सुचव. आम्हां पांच जणांना फक्त पांच गांवे, कुशस्थल, वृकस्थल, माकंदी, वारणावत आणि पांचवे जे त्यांना इष्ट वाटेल ते त्यांनी द्यावे असे सांग. सर्व सुखाने राहू या. मला सख्य आणि शांतीची जितकी अभिलाषा आहे तितकाच मी युद्धालापण तयार आहे!"

धर्मराजाचा तो संदेश घेऊन संजय हस्तिनापूरला परतला.





शिवपुराण

[२२]

विश्वनाथ तथा विशालाक्षी दोघे काशीला येऊन राहू लागल्यावर व्यास मुनींना वाटले की काही दिवस काशीला जाऊन काशीवास करावा. तो विचार मनात येतांच ते एक दिवशी आपल्या तीनशे शिष्यांसह काशीला येऊन पोंचले. त्यांच्या शिष्यांत वैशंपायन, जैमिनी, सुमंत आदि प्रमुख होते.

सर्व ऋषींनी प्रथम गंगेवर स्नानसंध्यादि करून गायत्री जप झाल्यावर शंकराची आराधना केली. व्यास मुनींनी शिष्यांसह मुक्तिमंडपात मध्याह्न होईपर्यंत शिवपुराणाचे वाचन केले. नंतर सर्व मंडळी भिक्षाटनास निघून गेली.

त्या वेळी शंकर पार्वतीला म्हणाला–"व्यास मुनींची परीक्षा घेतली पाहिजे. त्यांना किंवा त्यांच्या शिष्यांना कोणाला भिक्षा मिळता कामा नये."

विशालाक्षी पार्वतीने होकारर्थी मान हलवून नगरीच्या प्रत्येक गृहिणीच्या मनात भिक्षा न देण्याची प्रेरणा उत्पन्न केली. व्यास मुनी सशिष्य "भिक्षांदेहि!" म्हणत घरोघरी फिरत असतां त्यांना उत्तर मिळे–"अद्याप सैंपाकच झाला नाही!" किंवा "जेवणे आटोपून बराच वेळ होऊन गेला!" एकेका घरी तर कोणी दार देखील उघडले नाही.

तीन प्रहरी गुरु आपल्या मठात परत आले व सर्व शिष्यमंडळी रिकाम्या हातांनीच परतली. सर्वांना भुका लागल्या होत्या.

"मला भिक्षेत एक शीत देखील मिळाले नाही!" व्यास मुनी म्हणाले आणि त्यांनी



आपल्या शिष्यांना विचारले–"तुम्हांला काय काय भिक्षा मिळाली?" परंतु शिष्यांनीपण त्यांना मुळीच भिक्षा न मिळाल्याचे सांगितले.

लागोपाठ सात दिवस कोणालाच भिक्षा मिळाली नाही. व्यास मुनींना आश्चर्य वाटू लागले, या शिवपुरीत एका काळी दिवोदासासारख्याचे राज्य होते आणि आतां तर काशीविश्वनाथ स्वतः काशीवास करीत आहे. प्रत्येक या गावात गृहिणी अन्नपूर्णा म्हणून ओळखली जाते. एक आठवडाभर उपासमार व्हावी, याचे कारण काय? उपासामुळे वैशंपायन, जैमिनी, सुमंत

आठवा दिवस उजाडला. स्नानसंध्यादि आटोपून व्यासमुनी शिष्यांबरोबर भिक्षा-टनास निघाले.

परंतु एका घरीदेखील कोणी भिक्षा घातली नाही. तेव्हां मात्र व्यासांना मनस्वी राग आला. त्यांच्या कपाळाला आठ्या पडल्या. कपाळावर घामाचे थेंब दिसू लागले. त्यांनी कमंडलातून पाणी घेऊन शाप देण्यासाठी संकल्प सोडण्याचा निश्चय केला. आपले भिक्षापात्र फोडून सर्व काशी-वासियांस असा शाप देण्याचे ठरविले की तीन पिढ्या त्यांना विद्या, धन आणि भक्ती या तिन्हीचा लाभ होणार नाही. परंतु कमंडलातले पाणी सोडायला हात पुढे केला तेव्हां हात थरथर कापू लागला व कमंडलातले पाणी हातावर पडले नाही.

त्याच वेळी एका वृद्ध सौभाग्यवती स्त्रीने आपल्या घराचे दार उघडले. तिच्या सर्वांगावर शुभ्र वस्त्राभूषणे होती. ती म्हणाली–"हे ब्राह्मणा! शाप कां देतोस? माझ्याजवळ ये."

व्यासांनी तिच्याकडे चकित होऊन पाहिले आणि ती कोण, तिचे वय काय इत्यादि गोष्टींचा विचार केल्याशिवायच त्यांनी त्या स्त्रीला नमस्कार केला आणि

ती स्त्री म्हणाली–"[illegible] मिळाली नाही म्हणून का तू सर्व काशी नगरीला शाप द्यायला निघालास? तुझ्या हृदयाची परीक्षा घेण्यासाठी स्वतः काशी विश्वनाथाने हा डाव रचला होता. नाहीतर तुझ्या सारख्यांना भिक्षा घालणे या काशीवासियांस अशक्य होईल असे वाटले का तुला? दर रोज अन्नपूर्णा स्वतः सुवर्णाच्या पळीने अमृतासारखी खीर सर्वांना देते ही गोष्ट तुला माहीत नाही वाटते? तू आपला धीर सोडलास आणि विश्वनाथाला पत्नी स्वरूप असलेल्या या काशीनगरीस शाप देऊ लागलास. यावरून भूक ही तुझ्यासारख्या थोर महर्षीला देखील कशी हालवून सोडते हे उघड झाले आहे. बरे तर ये, मी तुला आज सशिष्य पंचपक्वान्नांचे मानून वाढते."

ते ऐकून व्यासमुनी म्हणाले–"माते! आज कित्येक दिवसांनंतर तुझे हे अमृत तुल्य गोड शब्द ऐकायला मिळाले आहेत. माते, तू काय वाटेल ती भिक्षा घाल, आम्ही ती आपसात वांटून घेऊन त्यांत मनाचे समाधान करून घेऊ."

ते ऐकून ती स्त्री स्मित करून म्हणाली–"बाळा! मध्याह्न उलटून चालली आहे. तुम्ही सर्व गंगास्नान करून या. तुम्हां सर्वांना मी स्वतः मनसोक्त जेवण वाढणार



त्यानंतर व्यास ऋषी आपल्या सर्व शिष्यांसह गंगास्नानास निघून गेले. स्नान-संध्यादि आटोपून पुन्हां त्या सुगृहिणीच्या घरी भोजनार्थ परत आले. त्या गृहिणीने सर्वांना आदरपूर्वक घरात बोलावून नेले. तिने पहिल्यापासून मांडून ठेवलेल्या पाटांवर त्यांना बसायला सांगितले आणि समोर केळीची स्वच्छ पाने मांडली.

नंतर धूप रांगोळी आदी झाल्यावर ती सर्वांस म्हणाली–"आतां आपोषणी घेऊन भोजनास सुरवात करावी."

ते ऐकून व्यास मुनी व त्यांचे शिष्य चकित होऊन परस्परांकडे पाहू लागले.

होती आणि पक्वान्नांचा वास पण येत नव्हता.

आज ही गृहिणी आपल्याला उपाशी मारून आपली सर्वांची खोड मोडणार असे दिसते आहे, असे सर्वांच्या मनात येत होते. परंतु त्याच वेळी काही स्त्रिया आपोषणी साठी पाणी घेऊन आल्या. ती वृद्ध स्त्री सर्वांना म्हणाली–"बाळांनो! जेवायला थोडा उशीर झाला, सावकाश होऊं द्या!"

सर्वांनी आपोषणी घेतांच सर्वांच्या पानावर प्रत्येकाला आवडणारे पदार्थ वाढलेले दिसले. सर्व पदार्थ स्वादिष्ट व प्रत्येकाला हवेतितके वाढलेले होते.

प्रत्येकाला वाटत होते की ती वृद्ध स्त्री प्रत्यक्ष अन्नपूर्णाच आहे.

जेवणे झाल्यावर त्या वृद्ध स्त्रीने सर्वांच्या विश्रांतीची व्यवस्था केली.

थोड्या वेळाने पार्वतीपरमेश्वर तेथे आले. सर्व विश्रांती घेत पडले होते. पार्वतीच्या चेहऱ्यावर शांतभाव होता. परंतु शंकराचा चेहरा उग्र दिसत होता. शिव[illegible]ला समोर पाहून सर्व उठून नम्रपणे प्रणाम करून उभे राहले.

शिवपार्वती उच्च आसनावर बसले. शंकराने व्यास मुनीकडे क्रुद्ध दृष्टीने पाहून विचारले–"काय रे ए, उद्दंड मूर्ख, महाभारत लिहिण्याचे मूर्खत्व करून आज मला पत्नीस्वरूप असलेल्या काशीनगरीस शाप द्यायला निघाला होतास नाही का? एक तर या काशीत तू प्रवेश केलास हाच तुझा अपराध! आतां जास्त वेळ न घालवितां आलास तसा ही काशी सोडून चालता हो!"

व्यासांनी पार्वती परमेश्वरांना नम्रपणे नमस्कार करून क्षमा मागितली आणि काशींहून निघण्यास तयारी करू लागले. तेव्हां पार्वतीला राहवले नाही. म्हणाली–"बाळ! तू काळजी करू नकोस. झालेल्या चुकीचे प्राय:श्चित्त दक्षारामला भीमेश्वराची उपासना करून कर. तुझे सर्वप्रकारे कल्याण होईल." पार्वतीच्या आज्ञेप्रमाणे व्यास आपल्या शिष्यमंडळी समवेत भीमेश्वराची उपासना करण्यासाठी दक्षारामला निघाले.



१३२. शंभर वर्षांचा वृक्ष

कॅरिबियन समुद्रात पोर्टोरिकोच्या पूर्वेकडे 'व्हर्जिन' हे द्वीप अमेरिकावासियांस एक सहलीचे स्थान म्हणून आहे. सर्वांत आधी १४७३ मध्ये कोलंबसने ही द्वीपें पाहिली. परंतु १९१७ मध्ये ही द्वीपें अमेरिकेच्या आधीन राज्यात सामील झाली. ही एकूण तीन द्वीपें आहेत–सेंट टॉमस, सेंट जॉन आणि सेंट क्रॉय. येथील निवासी नीग्रो आहेत. प्रवासी लोकांवरच यांची उपजीविका अवलंबून आहे. येथील समुद्राचा किनारा आकर्षक आणि हवापाणी समशीतोष्ण असल्या कारणाने यात्रेकरूना सहलीसाठी या बेटांवर यावेसे वाटते.

या द्वीपावरच्या विचित्र दृश्यांपैकी एक म्हणजे येथे एक "शंभर वर्षांचा वृक्ष" आहे. याची पाने जाड असतात. शंभर वर्षात फक्त एकदांच या झाडाला फुले येतात, म्हणे. म्हणून या झाडाला हे नाव मिळाले. याची फुले पिवळी व झुबकेदार असतात. पांच वर्षांच्या वयात सुद्धां फुले लागतात, परंतु फुले लागल्याबरोबर हे झाड मरते.



